रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १३७
www.ramprahar.com
◆ गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवाद्यांचा खात्मा; तीन जवान शहीद



**बस्तर :** छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त बस्तर विभागातील बिजापूर–दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये बुधवारी (दि. ३) मोठी चकमक झाली. यात आतापर्यंत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले आहे, तर सुरक्षा दलाचे तीन जवान शहीद आणि दोन जवान जखमी झाले आहेत. बस्तरचे आयजी सुंदरराज पी. यांनी या चकमकीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. केशकुतुलच्या जंगलात बिजापूर पोलीस, डीआरजी, एसटीएफ, कोब्रा बटालियन, सीआरपीएफ जवानांनी संयुक्तपणे अभियान राबवत नक्षलवाद्यांच्या गटाला घेरले. त्यानंतर चकमक सुरू झाली. या कारवाईत आतापर्यंत १२ नक्षलवाद्यांचा खात्मा झाला असून मारले गेलेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. चकमकीच्या ठिकाणाहून रायफल जप्त करण्यात आल्या असून शोधमोहीम सुरू होती.

अंतरंग
पनवेलमध्ये डुप्लिकेट नंबर प्लेटच्या कारसह शस्त्र जप्त/३
निवडणूक मतमोजणी लांबल्याने निकालाच्या अंदाजांना उधाण/५
मि. आशिया मेन फिजिकमध्ये प्रतिक दर्णेला कांस्यपदक/८

# जि.प. निवडणूकही दोन टप्प्यात?

**मुंबई : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुकांसाठी मंगळवारी मतदान पार पडले. त्यानंतर काही रखडलेल्या नगरपालिका निवडणुकीसाठी २० डिसेंबरला मतदान होणार असून २१ डिसेंबर रोजी सर्व ठिकाणी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. दुसरीकडे आरक्षणामुळे रखडलेल्या जिल्हा परिषद निवडणुका दोन टप्प्यात घेण्याच्या विचारात राज्य निवडणूक आयोग आहे. त्यासाठीच्या हालचाली निवडणूक आयोगात सुरू आहेत.



सर्वोच्च न्यायालयाने नुकताच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. सुनावणीवेळी कोर्टाने या पुढच्या कोणत्याही निवडणुकीत ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडू नका, असे सांगितले होते. त्यामुळेच त्याचे नियोजन करण्यासाठी निवडणूक आयोग जिल्हा परिषदा निवडणूक दोन टप्प्यात घेण्याचा विचार करीत आहे. ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या मुद्द्यावरून हा निर्णय होऊ शकतो.

राज्यातील ३२पैकी १७ जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली आहे. त्यामुळे त्या सोडून इतर १५ जिल्हा परिषदांची निवडणूक पहिल्या टप्प्यात घेण्याची तयारी निवडणूक आयोग करत आहे, तर उर्वरित १७ जिल्हा परिषदांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या २१ जानेवारीच्या सुनावणीनंतर दुसऱ्या टप्प्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर रोजी २९ महानगरपालिकांच्या आयुक्तांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत महापालिकांमध्ये निवडणुकीची कितपत तयारी झाली याचा आढावा घेतला जाणार आहे. ही निवडणूकदेखील येत्या काळात जाहीर होऊ शकते.

## राज्य विधीमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबरदरम्यान



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. १३ डिसेंबर शनिवार आणि १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधीमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

### समितीच्या बैठकीत निर्णय

विधानभवनात बुधवारी (दि. ३) विधीमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू, अमीन पटेल, विधान परिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधीमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या ऐतिहासिक पर्वानिमित्त २६ मार्च रोजी विधानसभेत चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधीमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन ९ डिसेंबर रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## शेकाप पदाधिकारी नकुल जोशी भाजपमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा धक्का बसला असून पडघे येथील शेकापचे पनवेल महानगर जिल्हा सहसचिव आणि माजी सरपंच नकुल जोशी यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी जोशी यांना भाजपची शाल देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले.



भाजपच्या पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात बुधवारी (दि. ३) झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, पनवेल तालुका उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, प्रभाग २चे अध्यक्ष कृष्णाशेठ पाटील, नारायणशेठ पाटील, महेश पाटील, वासुदेव पाटील, राम पाटील, गजानन पाटील, आशिष कडू, पवन भोईर, किरण दाबणे, शशिकांत गोंधळी, कैलास भोईर, नामदेव भोईर, रघुनाथ भोईर, विद्यानंद पाटील, महेश भोईर, विजय कांबळे, श्रीनाथ पाटील, सागर भोईर, रतन जोशी, अमित पाटील, अलंकार पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी जोशी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## फरार शीतल तेजवानीला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन व्यवहार प्रकरणातील प्रमुख आरोपी शीतल तेजवानीला अटक करण्यात आली आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून ती फरार होती.

पिंपरीची रहिवासी असलेल्या शीतल तेजवानीवर बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तेव्हापासून ती पोलिसांना गुंगारा देत होती. अखेर तिला पकडले.

## निवडक

### फायटर जेट इजेक्शन सीटची हाय–स्पीड चाचणी यशस्वी

**चंदिगड :** डीआरडीओ अर्थात भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने लढाऊ विमानांसाठी विकसित केलेल्या स्वदेशी इमर्जन्सी एस्केप सिस्टिम हाय–स्पीड रॉकेट स्लेड चाचणी यशस्वी केली आहे. चंदीगढ येथील टर्मिनल बॅलिस्टिक्स रिसर्च लॅबोरेटरीमधील रेल ट्रॅक रॉकेट स्लेड फॅसिलिटीवर हा महत्त्वपूर्ण प्रयोग पार पडला.

### सदानंद दाते होणार राज्याचे नवे पोलीस महासंचालक

**मुंबई :** वरिष्ठ आयपीएस अधिकारी सदानंद दाते महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी विराजमान होणार आहेत. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला येत्या ३१ डिसेंबर रोजी निवृत्त होत आहेत. राज्याच्या गृह विभागाने सात अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. त्यात १९९० बॅचचे आयपीएस अधिकारी दाते यांचे नाव प्रमुख्याने चर्चेत होते. त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

## मतदान यंत्रांना त्रिस्तरीय सुरक्षा



**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात २६४ नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २) मतदान प्रक्रिया झाली. एकूण ६७.६३ टक्के मतदानाची नोंद झाली. रायगड जिल्ह्यात १० नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाले, परंतु सगळ्या ठिकाणची मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी होणार असल्याने निकालासाठी १९ दिवस वाट पहावी लागणार आहे. दरम्यान, सर्व मतदान यंत्रे कडक बंदोबस्तात स्ट्राँगरूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली असून सर्व स्ट्राँगरूमना त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

रायगडात १० नगरपालिकांमधील ३४ नगराध्यक्षपदाच्या आणि ५७५ नगरसेवकपदांच्या उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. जिल्ह्यात मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सरासरी ७०.२६ टक्के मतदान झाले.

माथेरान पालिकेसाठी सर्वाधिक ८५.३५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, तर सर्वात कमी ६६.२३ टक्के मतदान श्रीवर्धन पालिकेसाठी झाले. जिल्ह्यात १० पालिकांमध्ये दोन लाख ३७ हजार मतदार होते. यापैकी एक लाख ६६ हजार ८५८ मतदारांनी मतदान केले. ८३ हजार ९८६ पुरुष, ८२ हजार ८७१ महिला, तर इतर एकाने मतदानाचा हक्क बजावला. कर्जत येथे ७२.३७ टक्के, अलिबाग ७०.३१ टक्के, मुरूड जंजिरा ७३.८९ टक्के, खोपोली ६८.५२ टक्के, उरण ६७.९२ टक्के, पेण ७०.३९ टक्के, महाड ७१.०३ टक्के आणि रोहा अष्टमी पालिकेत ७१.९२ टक्के मतदान झाले.

नगरपालिका निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार होता, परंतु **(पान २ वर..)**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या पायाभूत सुविधांसाठी ३५ लाख रुपयांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या आपल्या सामाजिक बांधिलकीतून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिन्नर तालुक्यातील दोन विद्यासंकुलांना त्यांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एकूण ३५ लाख रुपयांची भरघोस देणगी दिली आहे.




लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिन्नर तालुक्यातील ठाणगाव येथील पुंजाजी रामजी भोर विद्यालय आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामाकरिता २५ लाख रुपये इतकी देणगी दिली. त्याचप्रमाणे पांगरी येथील श्री संत हरीबाबा विद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी १० लाख रुपयांची देणगी दिली आहे.

एकूण ३५ लाख रुपयांची ही देणगी ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. यांच्या सीएसआर फंडातून देण्यात आली असून मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३) प्रदान करण्यात आला. या वेळी पुंजाजी रामजी भोर विद्यालयाचे मुख्याध्यापक काशिनाथ तळपाडे आणि मुख्याध्यापक राजेंद्र काकड उपस्थित होते. त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले. या योगदानामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि सुसज्ज इमारतीमध्ये शिक्षण घेता येणार आहे.

## खारघरमधील प्रणित मोरेला बिग बॉस फिनालेमध्ये विजेता करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे नागरिकांना आवाहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय रिॲलिटी शो असलेल्या बिग बॉस १९ सीझनच्या ग्रँड फिनालेमध्ये स्पर्धक प्रणित मोरे यांना विजयी करण्याचे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांना केले आहे.

स्थानिक पातळीवरून पुढे येत राज्यभरातील प्रेक्षकांची मने जिंकलेल्या प्रणित मोरे यांनी आपल्या शांत, संयमी व सकारात्मक स्वभावामुळे बिग बॉसच्या घरात विशेष ठसा उमटवला आहे. देशभरात प्रचंड लोकप्रिय असलेल्या या हिंदी रिॲलिटी शोमध्ये प्रणित हा एकमेव मराठी स्पर्धक असून तोही आपल्या खारघरचा असल्यामुळे संपूर्ण पनवेल, खारघरसह नवी मुंबई परिसरासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे. **(पान २ वर..)**

## किंग कोहलीचा ‘रन’वर्षाव!



**रायपूर : भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने रांचीपाठोपाठ दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यातही शानदार शतक (१०२ धावा) झळकावले. विराटचे हे वनडेतील ५३वे, तर एकूण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ८४वे शतक आहे. यासह त्याने महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा द. आफ्रिकेविरुद्ध २५ वेळा ५०+ धावा करण्याचा विक्रम मोडला.**



# मुंबईच्या वाहतुकीस मिळणार दिलासा

- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह बोगदा प्रकल्पाचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

पूर्व मुक्त मार्गामुळे नागरिकांना पूर्व उपनगरातून दक्षिण मुंबईत २०-२५ मिनिटांत पोहोचता येते; मात्र पुढील प्रवासासाठी अर्धा ते पाऊण तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत होते. तसेच पश्चिम उपनगर आणि दक्षिण मुंबईतील नागरिकांना नवी मुंबई विमानतळाकडे जाण्यासाठी लांबचा मार्ग घ्यावा लागत होता. या समस्येवर तोडगा म्हणून ऑरेंज गेट बोगद्याची संकल्पना मडण्यात आली, या प्रकल्पामुळे मुंबईच्या वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रवास अधिक सुलभ करण्यासाठी महत्त्वाकांक्षी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह शहरी बोगदा प्रकल्पाचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या वेळी टनेल बोरिंग मशीन (टीबीएम)चे लोकार्पण करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वे कर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमीन पटेल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्त रुबल अग्रवाल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पूर्वी या ठिकाणी फ्लायओव्हर उभारण्याचा विचार होता परंतु, जागेअभावी आणि प्रचंड वाहतुकीमुळे ते शक्य नाही. हा परिसर मोहम्मद अली रोड फ्लायओव्हरपेक्षाही अधिक दाटीचा असल्याने बोगदा हा एकमेव व्यावहारिक आणि सुरक्षित पर्याय आहे.

या प्रकल्पाचे काम डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, ते आणखी सहा महिने आधी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. एल अ‍ॅण्ड टी या नामांकित कंपनीकडे कामाची जबाबदारी सोपवण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. वरळी-शिवडी सी-लिंक पुढील वर्षी खुला झाल्यानंतर, तसेच कोस्टल रोड जोडणी झाल्यावर, पश्चिम उपनगरातील लोकांनाही नवी मुंबई विमानतळाकडे जाण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध होतील. त्यामुळे हजारो लोकांचे हजारो तास वाचवणारा हा प्रकल्प असून, मुंबईच्या वाहतुकीसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## कळंबोली स्टील मार्केटमधील हत्येप्रकरणी आरोपी अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सर्कलकडून बिमा कॉम्प्लेक्सकडे केंद्रीय भंडार निगम बोर्डचे समोरील रस्त्यावर व्यक्ती नामे रत्नेशकुमार राजकुमार जैस्वाल यास अनोळखी व्यक्तींनी जीवे ठार मारण्याचे उद्देशाने हाताबुक्यांनी व लाकडी दांडक्याने डोक्यात व इतर ठिकाणी मारहाण करून त्यास गंभीर स्वरूपाच्या दुखापती पोहचविल्याने त्यास दवाउपचारासाठी एमजीएम. हॉस्पीटल, कामोठे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन दवाउपचारास दाखल करण्यापुर्वी मयत झाल्याचे घोषीत केले. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे गुन्हा नोंद केला होता. याप्रकरणी सदर गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या २४ तासात अटक करण्यात आली आहे.

खूनासारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्हयातील अनोळखी आरोपी इसमांचा शोध घेणेकामी नवी मुंबई येथील अधिकारी व अंमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक तपासकामी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे तपास करण्यासाठी दोन वेगवेगळी पथके तयार केली होती. यानुसार केलेल्या तपासात सदरचा गुन्हा दोन अनोळखी इसमांनी केल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने गुन्हयाचे घटनास्थळ व परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले असता सदरचा गुन्हा स्कुटी वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले.

गुन्हयाचे तांत्रिक तपासात सदर इसमांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या स्कुटीबाबत माहिती घेवून त्याद्वारे गुन्हयाचा तपास करण्यात आला. व आरोपी मोहम्मद चाँद शाबीर शेख (वय २५ वर्षे, कळंबोली) तसेच जुएफ जमिल ईलियास शेख (वय २५ वर्षे, कळंबोली) या आरोपींना विश्वासात घेवून त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता कळंबोली स्टिल मार्केट सर्व्हिस रोड येथे उभे असलेल्या तृतीयपंथी यांच्यासोबत वाद सुरू झाला.

हा वाद मिटविण्यासाठी मयत इसम रत्नेशकुमार जैसवार व त्याचे मित्र आल्याने त्याचा राग मनात धरून त्यांनी मयत रत्नेशकुमार जैसवार यांच्याशी वाद घालुन त्यांनी मयत याचे खानावळीचे बाजुस पडलेले लाकुड घेऊन रत्नेशकुमार यास जिवेठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर, छातीवर व इतर ठिकाणी मारहाण करून तेथुन पळुन गेल्याचे सांगितले. याबाबत पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेल करीत आहेत.

## निवडक

### ओळखीच्या व्यक्तींकडून दागिन्यांची लूट

**पनवेल :** ओळखीच्या व्यक्तीकडून दागिन्यांची लूट झाल्याची घटना आदई येथील बालाजी स्प्लेंडर इमारतीमध्ये घडली आहे. आदई येथील बालाजी स्प्लेंडर इमारतीमध्ये राहणारे दाम्पत्य कामावर गेले होते. त्याच दिवशी त्यांच्या घरी गावावरून आलेला त्यांचा चुलत भाऊ होता. कामावरून घरी आल्यावर त्यांचा भाऊ त्यांना दिसला नाही. दुसऱ्या दिवशी त्यांना घरातील सोन्याचे दागिने ठेवलेल्या जागेवर सहा लाखांचे दागिने सापडले नाहीत.अखेर या दाम्पत्याने खांदेश्वर पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली.

### नेरूळ येथे आज धम्म प्रवचन

**नवी मुंबई :** कपिलवस्तु बुद्ध विहार सेवा समितीयांचे विद्यमाने मार्गशीर्ष पौर्णिमेनिमित्त प्रज्ञावंत यांचे जाहीर धम्म प्रवचन आणि धम्मदेसना ४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता दरम्यान कपिलवस्तु बुद्धविहार, सेक्टर-१०, नेरूळ येथे होणार असून नेरूळ परिसरातील सर्व बौद्ध धम्म उपासक व उपासिक यांनी कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे समितीचे सरचिटणीस एल आर गायकवाड यांनी कळविले आहे.

### स्वामी समर्थ प्राणप्रतिष्ठा सोहळा

**नवी मुंबई :** धर्मवीर संभाजीराजे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री शनैश्वर मंदिर, सेक्टर ४६, सिवूड्स यांच्या वतीने आयोजित श्री दत्त जयंती निमित्त अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा गुरुवार, ४ डिसेंबर २०२५ सकाळी ७ ते १० दरम्यान होणार आहे. यावेळी श्री समर्थ सद्गुरू अविनाश महाराज यांचे प्रवचन त्यानंतर होणार असून सायंकाळी रामानंद संप्रदाय यांचे सुश्राव्य भजन, सायंकाळी आरती आणि महाप्रसाद असून याचा भक्तगणांनी लाभ घ्यावा, असे आयोजक दत्ता घंगाळे यांनी कळविले आहे.

## एमपीतील आरोपी पकडण्यासाठी खांदेश्वर पोलिसांची शोधमोहीम

**पनवेल : वार्ताहर**

अल्पवयीन मुलीचे मध्यप्रदेशमधून अपहरण करणारा आरोपी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दित लपून बसल्याची माहिती खांदेश्वर पोलीस ठाण्यास प्राप्त झाली आहे.

मध्य प्रदेशमधील धार जिल्हयातील पीथमपुर येथील आरोपी भदईराम उर्फ रामनाथ उर्फ रामबाबू याने धन्नड या गावातून ७ वर्षीय शिवानी या मुलीचे अपहरण करुन तो गायब झाला होता. दि. १० एप्रिल रोजी त्याने या मुलीचे अपहरण केले होते. याबाबत पीथमपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीला महाराष्ट्रात नवी मुंबई खांदेश्वर पोलीस ठाणे पनवेलच्या हद्दित असल्याचे पाहिले गेले असल्याने खांदेश्वर पोलीसही या आरोपीचा शोध घेत आहेत.

या आरोपीबाबत कुणाला काही माहिती असल्यास खांदेश्वर पोलिसांची संपर्क साधण्याचे आवाहन खांदेश्वर पोलीस ठाण्याकडून करण्यात आले आहे. सदर आरोपीस पकडून देणार्यास पीथमपूर पोलिसांनी १० हजार रुपयांचे बक्षिसही जाहीर केले आहे. तसेच याबाबत माहिती देणाराचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असल्याचेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

## महाडमधील राड्याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारी दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी झालेल्या दोन गटातील हाणामारी प्रकरणात महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये सुशांत जाबरे यांनी केलेल्या तक्रारीमध्ये विकास गोगावले यांच्या नावाचादेखील समावेश केला आहे.

महाड नगरपालिका निवडणुका मंगळवार, २ डिसेंबर रोजी शांततेत सुरू असतानाच दुपारी प्रभाग क्रमांक तीन आणि दोन चे मतदान ज्या ठिकाणी सुरू होते त्या मतदान केंद्रापासून काही अंतरावरच दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते विकास गोगावले विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे सुशांत जाबरे यांच्या गटांमध्ये हा वाद झाला होता. जाबरे यांच्या दोन अंगरक्षकांना बेदम मारहाण केली गेली. त्यानुसार महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

सुशांत जाबरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सुशांत जाबरे हे त्यांच्या फॉर्च्युनर गाडी क्रमांक एम एच ०२ एफ एक्स ४१०० ने निवडणुकीचा आढावा घेत असताना आरोपींनी गाडी जवळ जात शिवीगाळ दमदाटी आणि जीवे मारण्याची धमकी देऊन सोबतच्या गाड्यांच्या काचा फोडल्या. या वेळी आरोपीत विकास गोगावले यांनी सुशांत जाबरे यास मारहाण केली. तर त्यांचा रक्षक गोपाल सिंग यास देखील मारहाण करण्यात आली. याप्रकरणी विकास भरत गोगावले महेश गोगावले विजय मालुसरे प्रशांत शेलार धनंजय मालुसरे वैभव मालुसरे सुरज मालुसरे सिद्धेश शेठ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाडच्या राजकीय राड्यानंतर परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले आहेत.

दुसऱ्या तक्रारीत महेश निवृत्ती गोगावले (वय ३९, रा. पिंपळवाडी, महाड) यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. या तक्रारीनुसार पोलिसांनी सुशांत जाबरे (रा. टोळ), हनुमंत मोतीराम जगताप, श्रीयश माणिक जगताप, धनंजय (बंटी) देशमुख, जगदीश पवार (सर्व रा. महाड), निलेश महाडिक (रा. किंजळोली, महाड) तसेच अमित शिगवण, व्यंकट मंडाला, गोपालसिंग, मंजीतसिंग अरोरा, मोनीश पाल, समीर रेवाळे आणि इतर ८-१० जणांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. गोगावले यांच्या तक्रारीनुसार, वरील सर्व आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने जमाव जमवला. यापैकी गोपालसिंग यांनी बंदूक रोखून जिवे मारण्याचा प्रयत्न केला, तसेच इतरांनी काठी व हॉकीस्टिकने त्यांच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली.

## आयटीएमएस प्रणाली तात्पुरती बंद

**नवी मुंबई :** महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आयटीएमएस सर्व्हरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने एनएमएमटी ची बस ट्रॅकर ॲप सेवा सद्यस्थितीत बंद झाली आहे. त्यामुळे प्रवाशांना या ॲपद्वारे बसगाड्यांविषयी माहिती ट्रॅक करता येत नाही व त्यांच्या ठिकाणांबाबतची माहिती उपलब्ध होत नाही.

तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी एनएमएमटीचा आयटीएमएस विभाग कार्यवाही करीत असून तांत्रिक टीममार्फत एनएमएमटी बस ट्रॅकर ॲप प्रणाली पुन्हा सुरळीत व सुरक्षितपणे कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्यात येत आहेत. अचानक उद्भवलेल्या या तांत्रिक अडचणीमुळे प्रवाशांना होणाऱ्या असुविधेबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात येत असून सदर आयटीएमएस प्रणाली लवकरात लवकर पूर्ववत कार्यान्वित होईल, असे नमुंमपा परिवहन प्रशासनाने कळविले आहे.

## अल्पवयीन मुलीची सोनसाखळी लुटली

**पनवेल : वार्ताहर**

तीन अनोळखी तरुणांनी एका अल्पवयीन मुलीची सोनसाखळी लुटल्याची घटना कामोठे वसाहत परिसरात घडली आहे.

कामोठेत सकाळी फेरफटका मारणाऱ्या अल्पवयीन मुलीची स्कूटीवरून आलेल्या तीन अनोळखी तरुणांनी सोनसाखळी लुटल्याची घटना घडली असून कामोठे उपनगरातील सेक्टर २५ येथील जेएनपीटी ते कळंबोली सर्कलला जोडणाऱ्या सेवा रस्त्यावर हा प्रकार घडला. तीन युवकांनी स्कूटीवरून पहाटेच्या वेळी घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला थांबवले.

मुलीला जबरदस्तीने अडवून तिच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून नेली. या वेळी मुलीच्या मानेला जबर जखम झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

## मतदान यंत्रांना त्रिस्तरीय सुरक्षा

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या संदर्भात दाखल याचिकेवर सुनावणीदरम्यान मंगळवारी मतदान झालेल्या आणि २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानाची मतमोजणी एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर रोजी घ्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे.

ज्या उमेदवारांना विजयाची खात्री आहे, त्यांनी विजयी जल्लोषाची तयारी केली होती. याचे नियोजन बरेच दिवस आधीपासूनच सुरू होते. गुलाल, वाद्यपथकांची अगोदरच ऑर्डर दिली होती. त्यासाठी मंगळवारी सकाळपासूनच उमेदवारांचे कार्यकर्ते मतदानासाठी मतदारांना बाहेर काढत होते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते आणि अचानक न्यायालयाचा निर्णय येऊन धडकला. न्यायालयाच्या निर्णयाने आनंद साजरा करण्यासाठी १९ दिवस वाट पहावी लागणार आहे.

मतदानोत्तर मतदान यंत्रे २१ तारखेपर्यंत सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. निवडणुकांच्या पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने स्ट्राँग रूमची अंतिम यादी जाहीर केली आहे. प्रत्येक नगर परिषद क्षेत्रासाठी मतदानोत्तर इव्हीएम ठेवण्यासाठी स्वतंत्र आणि उच्च सुरक्षा असलेली ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणुकांदरम्यान आणि मतमोजणीपर्यंत या स्ट्राँग रूममध्ये कडक बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख आणि तीन स्तरांची सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. स्थानिक पोलीस बंदोबस्ताबरोबरच राज्य राखीव पोलीस दलदेखील इव्हीएमच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे. या सर्व स्ट्राँगरूम सीलबंद करण्यात आल्या आहेत.

## खारघरमधील प्रणित मोरेला बिग बॉस फिनालेमध्ये विजेता करा

ग्रँड फिनालेसाठीचे मतदान सध्या सुरू झाले असून ६ डिसेंबरपर्यंत हे मतदान चालू राहणार आहे. नागरिकांनी स्वतः तसेच मित्र-परिवारासह प्रणित मोरे यांना मतदान करून त्यांना बिग बॉसचा विजेता बनवावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे.

प्रणित मोरे हा आपल्या परिसराचा अभिमान आहे. त्याने बिग बॉसमध्ये प्रामाणिक, सुसंस्कृत व सकारात्मक खेळ सादर केला. त्याच्या मेहनतीला आणि प्रामाणिकतेला आपण सर्वांचा भरभरून पाठिंबा मिळायला हवा. फिनालेतील त्याचा विजय हा आपल्या सर्वांचा विजय ठरेल. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन प्रणितला बिग बॉस बनवावे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवाहन केले आहे.

बिग बॉस या हिंदी शोने संपूर्ण देशभरातील प्रेक्षकांवर भुरळ घातली आहे. आपल्या पनवेल, खारघर, नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात या इंडस्ट्रीचे लोकं आणि चाहते आहेत. त्यामुळे आपला प्रणित मोरे बिग बॉस झाला पाहिजे यासाठी नक्कीच प्रत्येक जण योगदान देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## पनवेल महापालिकेतर्फे जागतिक दिव्यांग दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका दिव्यांग कल्याण विभागातर्फे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि.३) विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कळंबोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

ज्या दिव्यांग बांधवाची नोंद पालिकेडे झाली नाही त्यांनी पालिकेकडे अधिकृत नोंदणी करावी, असे आवाहन उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले.



वैद्यकिय आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी या वेळी दिव्यांग बांधवांसाठीच्या महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमामध्ये दिव्यांग बांधवांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्त तपासण्या, कान नाक घसा तपासणी, आयुष्यमान कार्ड वाटप करण्यात आले होते. किशोर गोखील यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाबरोबरच ' मेरी आवाज ही मेरी पेहचान है' हा खास अंध बांधवांच्या गाण्याच्या कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आला.

दिव्यांग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धांमध्ये सुमारे १७ सुवर्ण पदक जिंकलेले कळंबोली मधील दिव्यांग वेट लिफ्टींग व गोळाफेक चॅम्पियन विनोद देवकर यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, कळंबोली सहाय्यक पोलीस अधिक्षक दत्तात्रय डफळ, दिव्यांग विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, वैद्यकिय अधिकारी डॉ. भक्तराज भोईट, डॉ. पंडित, दिव्यांग क्रांती संघटनेचे अध्यक्ष बी.जी पाटील, राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष दिपक घाग, प्रज्योत सिंग धार्मा, प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे अध्यक्ष सुरेश मोकल आदी उपस्थित होते.

## कपड्याच्या दुकानात चोरीचा प्रयत्न

**पनवेल :** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कपड्याच्या दुकानासह इतर दुकानात चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. येथील फॅशन वर्ल्ड या दुकानात अज्ञाताने चोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. त्याचप्रमाणे स्वाती ऑप्टिक्स या दुकानाचेसुद्धा शटर उचकटण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत पनवेल शहर पोलिसांना माहिती देण्यात आली आहे.

## टेम्पो उलटून सात जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर अंडा पॉईंटजवळ लोणावळा येथून खोपोलीत येणाऱ्या छोट्या टेम्पोला (छोटा हत्ती) चालकाचे नियंत्रण सुटल्याने उलटला. या अपघातात सात जण किरकोळ जखमी झाले.

वाहन चालक व खोपोलीतील सामाजिक कार्यकर्ते व बोरघाट पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. नेहा सलाट (वय सहा, आर्यन सलाट (वय तीन), करिना सलाट (वय चार), नैना सलाट (वय २०), चंदा सलाट २०, शिवा सलाट २५, शामु सलाट ६० यांचा समावेश आहे. ही घटना सायंकाळी ४.३० वा सुमारास घडली.

## कर्जतमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ९० जणांनी रक्तदान करून शहीदांना आदरांजली वाहिली. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत, खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५३० वे रक्तदान शिबिर ठरले.

शहिद दिनानिमित्त कर्जत पोलीस ठाण्याच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, वरीष्ठ पोलिस निरीक्षक संदीप भोसले, अभिजित मराठे, आशिष गोखले, बाली परदेशी, विवेक भागवत,रोनक कोठारी कल्पेश शाह, संदिप भोईर, सदामामा जोशी, विनोद पांडे, कृष्णा जाधव, अमिरभाई मणियार, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रभाकर करंजकर, संजीव ठाकरे, लोकेश यादव, अनिल शहा, कौस्तुभ परांजपे आदी उपस्थित होते.



या रक्तदान शिबिरात प्रथम रक्तदान उत्तम जाधव यांनी केले. राजाभाऊ कोठारी यांनी वैयक्तिक १११ वे रक्तदान केले. शहीद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या स्मृति जपण्यासाठी शासनामार्फत स्मृति स्तंभ उभारण्यात आले. त्याचे अनावरण करण्यात आले.

रक्त संकलनाचे काम कल्याण येथील संकल्प रक्त केंद्राचे डॉ. सोनल देसाई, राजशेखर नायर, समृद्धी देसाई, निता शिव, रोहिणी औटी, भाविका औटी, शितल पवार, जगदिश महाजन यांनी पद्धतीने केले. या वेळी बाली परदेशी, आशिष गोखले आदी उपस्थित होते.

## दुखवटा

### सीताबाई कुंरगळे



**पनवेल :** नारपोली येथील ह.भ.प. सीताबाई जेठू कुंरगळे यांचे वयाच्या ७८व्या वर्षी आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दिर, जावई, सुना, नातवंडे असा मोठा कुंरगळे परिवार असून नारपोली स्मशानभूमीत त्यांना सर्व क्षेत्रातील मंडळींनी श्रध्दांजली अर्पण केली.

### अण्णा पाटील

**खोपोली :** नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावचे ज्येष्ठ ग्रामस्थ अण्णा तात्या पाटील यांचे बुधवारी (दि.३) अल्पशा आजाराने निधन झाले, ते ८८ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, तीन विवाहित कन्या, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. अण्णा पाटील हे १९७५ साली नगरपालिका स्थापन होण्यापूर्वी ते ग्रुप ग्रामपंचायत मानकिवलीचे सदस्य होते, त्याचप्रमाणे महेंद्र कारखान्यात त्यांनी निवृत्तीपर्यंत नोकरी केली. सामाजिक अध्यात्मिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य होते.

# अट्टल आरोपींना अटक; नऊ गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलकडून चार अट्टल आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून नऊ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

पनवेल जवळील ए-टॅक इंटरप्रायझेस कंपनीच्या साईटवर उरण ते गव्हाणफाटा या रस्त्यावर गव्हाणफाटा चौकीच्या पुढे उरणकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्याबाजुस सुरू असलेल्या रेल्वे ब्रिजच्या बांधकाम साईटवर चार अनोळखी चोरट्यांनी बोलेरो पिकअपसह येवुन साईडवरील वॉचमनचे हात रस्सीने बांधुन त्यास मारहाण केली. तसेच सदर ठिकाणावरून लोखंडी रेल्वे ब्रिज बनविण्याचे साहित्य व सामानाची चोरी केली, म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

यानंतर गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले. पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे बेलापुर येथुन आरोपी समशेर शेर खान (वय २१, सध्या रा. दिवाळे गाव) व कुलदिप बच्चु सिंग (वय २३, रा. सेक्टर १४, सीबीडी. नवी मुंबई) यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे तपास करता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. पनवेल शहर, कामोठे तसेच उलवा पोलीस ठाणे हद्दीतुन बिल्डींग बांधकामाकरीता वापरण्यात येणारे स्टिल व इतर साहित्य चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले.

कुलदीप सिंग या आरोपीचा सक्रिय सहभाग आढळल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. नमुद दोन आरोपींकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात कळंबोली पोलीस ठाणे, गुरूनाथ शनमुखअप्पा नरशेट्टी (वय ६४, रा. प्लॉट नंबर १२, सेक्टर १४, कळंबोली) हे त्यांचे पत्नीसह बेंगलोर येथे गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य दरवाज्याचे लॉक तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करून घरातील बेडरूममधील कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी केल्याने कळंबोली पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष पथकाने कळंबोली, पनवेल, तळोजा परिसरातील सीसीटिव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून तसेच तांत्रिक तपासाद्वारे हा गुन्हा आरोपी सलिम मोहम्मद शेख (वय ३७, रा. दापोली) व तौफिक मोहम्मद शेख (वय ३२, रा.चिकोडी) आरोपींनी केल्याचे निष्पन्न केले. मिळालेल्या गुप्तबातमीप्रमाणे वर नमुद आरोपींना अंबरनाथ येथुन ताब्यात घेण्यात घेतले.

आरोपींकडुन गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सध्या ते तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत आहेत. पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ गुन्हे व कामोठे १ व उलवा १ येथील गुन्हे उघडकीस करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# एड्स निर्मूलन सप्ताहानिमित्त पनवेलमध्ये रॅली

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एड्सची लागण झालेल्या व्यक्तीलाही समाजामध्ये जगण्याचा अधिकार आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी एड्स निर्मूलन सप्ताहाच्या निमित्ताने पनवेलमध्ये आयोजीत केलेल्या रॅलीच्या शुभारंभावेळी केले.

कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्थेच्या लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग, सुशीला नर्सिंग कॉलेज, डॉक्टर जयश्री पाटील इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग यांनी रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन आणि पनवेल उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल एड्स निर्मूलन सप्ताहाच्या निमित्ताने पनवेल येथे भव्य रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाला.

या रॅलीला लाईफ लाईन हॉस्पिटलपासून सुरुवात झाली असून पुढे छत्रपती शिवाजी महाराज मार्ग-लाईन आळी, जयभारत नाका मार्गे उपजिल्हा रुग्णालय येथे पोहोचली, तेथे पथनाट्य सादर झाले. त्यानंतर रॅली पनवेल महापालिका, सावरकर चौक, यूपीएससी गावदेवी मंदिरामार्गे लाईफ लाईन हॉस्पिटल येथे पोहोचून तेथे समारोप करण्यात आला. यावेळी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करुन एड्स आजाराबद्दल जनजागृती केली.

या कार्यक्रमाला लाईफ लाईन हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. प्रकाश पाटील, डायरेक्टर्स डॉ.जयश्री पाटील, डॉ.अभितेज म्हस्के, डॉ.केतकी पाटील-म्हस्के, डॉ. अजिंक्य पाटील, डॉ.जान्हवी पाटील, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनचे अध्यक्ष निलेश पोटे, सेक्रेटरी हितेश रजपूत, पूर्व अध्यक्ष व्ही. सी. म्हात्रे, कल्पेश परमार, चारुदत्त भगत, संजय जैन, तुषार तटकरी, कल्पना नागांवकर, बसंती जैन, दिपाली व्होरा, भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, लाईफ लाईन हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. गौरी शिवानी, महेंद्र उरणकर, राजेश भूषण, प्राचार्या डॉ. सुपर्णा सुनील पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवाजी पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. ईटकरे, डॉ.राठोड, समुपदेशक विकास कोमपले, यांच्यासह लाईफ लाईन हॉस्पिटल आणि उपजिल्हा रुग्नालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

# मालडुंगे येथे ग्रामपंचायत कार्यालय, नागरी सुविधा केंद्राची होणार उभारणी



## अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विकासकामांना गती मिळत आहे. त्यानुसार त्यांच्या प्रयत्नांमुळे सुमारे २५ लाख रुपयांच्या निधीमधून मालडुंगे येथे ग्रामपंचायत कार्यालय आणि नागरी सुविधा केंद्र बांधण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३) झाले.

राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानांतर्गत मालडुंगे येथे ग्रामपंचायत कार्यालय व नागरी सुविधा केंद्र बांधण्यात येणार आहे. या विकास कामांच्या शुभारंभावेळी जागतिक दिव्यांग दिनानिमीत्त ग्रामपंचायतीच्या ५ टक्के राखीव निधीमधून २ हजार रुपयांचा धनादेश दिव्यांग बांधवांना देण्यात आला. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, राजेश भोईर, उषा वारगडा, अर्जुन कांबडी, गणेश शील, विकास भगत, गणपत वारगडा, धर्मा पारधी, सुनिल वारगडा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलमध्ये डुप्लिकेट नंबर प्लेटच्या कारसह शस्त्र जप्त

## चालकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल वाहतूक शाखेच्या कारवाईत नवीन पनवेल रेल्वे स्टेशन (पूर्व) परिसरातून डुप्लिकेट नंबर प्लेट लावलेली संशयित फॉर्च्युनर कार जप्त करण्यात आली असून कारमध्ये पिस्तूलसदृश शस्त्र सापडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. चालकास अटक करून पुढील तपास खांदेश्वर पोलिसांकडे सोपविण्यात आला आहे.

पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेची टीम स्टेशन परिसरात वाहतूक नियमन करत असताना ही घटना उघडकीस आली. फॉर्च्युनर (एमएच ०३ एएच ७८६३ हे वाहन अनधिकृतरित्या उभे असल्याचे दिसून आले. वाहनचालकाचा शोध घेण्यासाठी गाडीवर नोंद असलेल्या मालकाशी संपर्क साधण्यात आला, मात्र त्यांनी ही गाडी माझी नसून अज्ञात व्यक्ती माझ्या वाहनाचा क्रमांक वापरत आहे. याबाबत मी पूर्वीही तक्रारी केल्या आहेत, अशी माहिती दिल्याने वाहतूक पोलिसांना संशय आला.

यानंतर पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता समोरील दरवाजा अर्धवट उघडा आढळला. आत पिस्तूलसदृश शस्त्र आढळून आले. पुढील पाहणीत राजेंद्र निकम या नावाचे ड्रायव्हिंग लायसन्सही मिळाले. कोर्ट चेकर ॲपमध्ये तपासणी केली असता निकम यांच्याविरोधात मुंबई विभागात विविध गुन्हे नोंद असल्याचे समोर आले. मुंबई येथून काही वेळानंतर निकम हे स्वतः घटनास्थळी आले. वाहनावर डुप्लिकेट नंबर प्लेटचा वापर, अनधिकृत पार्किंग आणि वाहनातून शस्त्रसदृश वस्तू मिळाल्यामुळे त्यांना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी खांदेश्वर पोलीस स्टेशनकडे सोपविण्यात आले.



**खांदा कॉलनी :** युवा नेते विजय काळे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या शोकसभेला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरचिटणीस भीमराव पोवार, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे तसेच गोपीनाथ मुंडे, अभिषेक भोपी, गणेश पवार, विनोद साबळे, सदानंद शिर्के, शिवाजी थोरवे, काळे परिवार, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी, नागरिक उपस्थित होते.

# गव्हाण गावात रस्ते काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

**उरण : रामप्रहर वृत्त**



उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे जिल्हा नियोजन निधीतून गव्हाण गावातील मालठ मैदान ते मोनीश फडकर यांच्या घरापर्यंतच्या अंतर्गत रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामास प्रारंभ झाला आहे. या कामामुळे दीर्घकाळ रखडलेली ग्रामस्थांची मागणी अखेर पूर्णत्वास येत असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

या रस्ते कामाचा शुभारंभ पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य आणि भाजपचे ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. प्रारंभ सोहळ्यावेळी बोलताना उलवा नोड महिला मोर्चाच्या अध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत यांनी सांगितले की, ग्रामविकास हा आमदार महेश बालदी यांचा प्राधान्यक्रम असून पायाभूत सुविधांच्या उभारणीमध्ये उरण तालुका जलदगतीने प्रगती करीत आहे. गव्हाण परिसरातील या रस्त्याच्या काँक्रीटीकरणामुळे नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमास गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, कैलास कोळी, जयवंत देशमुख, मयूर ठाकूर, राकेश कोळी, प्रसन्न कोळी, वामन कोळी, अशोक कडू, उषा देशमुख, समाधान कोळी, सुहास भगत, सदानंद देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक ग्रामस्थांनी रस्ते कामाच्या शुभारंभाबद्दल समाधान व्यक्त करत आमदार महेश बालदी यांचे आभार मानले आहेत.

# सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालयात बुधवारी (दि.३)विज्ञान यात्री अंतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा हा या मागचा उद्देश.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन सुकापूर ग्रामपंचायतीच्या सदस्य प्राची अमित जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे उपस्थित होते. प्रदर्शनाचे परीक्षण उच्च माध्यमिक विभागाचे प्राध्यापक विजय कुमावत व माध्यमिक विभागाच्या शिक्षिका नीलम कैलास म्हात्रे यांनी केले. या वेळी सर्व मान्यवरांचे व परीक्षकांचे स्वागत प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.



या प्रदर्शनात इयत्ता चौथी सिंहगडच्या विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा आणि रस्त्यावरील स्वयंचलित दिवे हा प्रयोग सादर करून चौथीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला. इयत्ता तिसरी भगतसिंगच्या विद्यार्थ्यांनी जलस्तर सूचक केंद्र हा प्रयोग सादर करून तिसरीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला तर इयत्ता दुसरी गंगाच्या विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेती हा प्रयोग सादर करून दुसरीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आणि इयत्ता पहिली जुईच्या विद्यार्थ्यांनी पवनचक्की हा प्रयोग सादर करून पहिलीतून प्रथम क्रमांक संपादन केला.

# सीकेटी विद्यालयात आनंद मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नविन पनवेलमधील चांगू काना ठाकूर इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागात बुधवारी (दि.२६) भव्य आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर चारुशीला घरत तसेच भाजपच्या पनवेल प्रभाग २० च्या अध्यक्षा सुनीता पाटील यांच्या हस्ते झाले.

दैनंदिन जीवनात आपण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीत्या बाजाराशी जोडलेले आहोत. वस्तूंची खरेदी-विक्री कशी केली जाते. पैश्याचा व्यवहार कसा केला जातो ह्या विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना लहान वयातच अवगत व्हावे यासाठी अश्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी घरगुती खाद्यपदार्थ, विविध वस्तू, फळे, भाज्या व स्टेशनरी वस्तू यांचे स्टॉल लावून उपक्रमात उत्सफूर्तपणे सहभाग घेतला.

प्रमुख पाहुण्या चारुशीला घरत आणि सुनीता पाटील यांनी मेळाव्याचा मनमुराद आनंद घेत समाधान व्यक्त केले. या मेळाव्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी मनमुरादपने खरेदीचा व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. अश्या प्रकारे शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



# रसायनीतून मुलगा बेपत्ता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वावेघर येथे राहणारा साहिब जहिद दिवाण (वय १३ वर्ष ४ महिने) हा मोहोपाडा येथील मोबाईलच्या दुकानात जातो असे सांगून घरातून निघून गेला.तो अल्पवयीन आहे, हे माहीत असून सुद्धा -कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळून नेले असावे असा अंदाज वर्तविला जात आहे. त्याची आई सलमा खातून जाहिर दवाण हिने आजुबाजुला नातेवाईक मित्र, मैत्रिणी व गावात शोध घेतला तो मिळून न आल्याने रसायनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. साहिब हा अंगाने सडपातळ असून त्याची उंची साडेचार फुट आहे. रंग गोरा, काळी पॅन्ट, काळी हुडी टी-शर्ट, पायात चप्पल-असे वर्णन आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# चिपळे पूल ते नेरे रस्ता दुरुस्ती कामाला सुरुवात

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रयत्न यशस्वी; नागरिकांना दिलासा

**पनवेल :** सिडकोच्या नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम आजपासून सुरू झाले आहे. हा रस्ता दररोजची वर्दळ असलेला असून, यावरील मोठमोठे खड्डे आणि उखडलेल्या भागांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आता या कामाला सुरुवात झाली नागरिकांना दिलासा मिळाला आहे. याकामी आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रयत्न कामी आले आहेत.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेला हा रस्ता सिडकोकडे हस्तांतरणानंतर नैना हद्दीत समाविष्ट झाला आहे. कायम वर्दळीचा रस्ता खराब झाल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांच्या मागणीला गांभीर्याने घेत सिडको व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन दिले होते आणि रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले होते. या रस्त्याचे काम तातडीने सुरू झाले आहे. आमदार ठाकूर यांचा पुढाकारामुळे नागरिकांना आता सुरक्षित आणि सुकर प्रवासासाठी दिलासा मिळाला असून नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



# पनवेलमध्ये उपयोगी वस्तूंच्या प्रदर्शन जागेचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरूपक्ष मंदिर परिसरातील रहिवाशांसाठी दर्जेदार आणि किफायतशीर गृहउपयोगी वस्तू व कपड्यांची सर्वसमावेशक श्रेणी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारे भव्य Exhibition-cum गृहउपयोगी वस्तू प्रदर्शन सुरू होणार आहे.

या प्रदर्शनाचे भूमिपूजन व उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते झाले. सुमारे ५००० चौरस फूट इतक्या मोठ्या जागेत उभारण्यात येणाऱ्या असलेल्या या प्रदर्शनात घरगुती वस्तू, दैनिक उपयोगाच्या वस्तूंपासून कपडे, ब्रँडेड प्रॉडक्ट्स अशा विविध वस्तूंची विस्तृत श्रेणी ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहे.

या जागेचे दुकानाचे मालक शाहिद भाई शेख असून, गत बारा वर्षांपासुन ते येथील पनवेल मध्ये फर्स्ट चॉईस दुकाना मार्फत पनवेल वासियाना उत्तम सर्विस देत आहेत. उद्घाटनावेळी नगरसेविका दर्शना भोईर यांनी प्रदर्शन आयोजकांचे कौतुक करताना असे सांगितले की, या फर्स्ट चॉईस प्रदर्शनामुळे पनवेल परिसरातील नागरिकांना सर्व वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होतील, तसेच स्थानिक उद्योजकतेलाही चालना मिळेल.

नागरिकांसाठी खुले असलेले हे प्रदर्शन मर्यादित कालावधीसाठी सुरु राहणार असून, खरेदीची उत्तम संधी उपलब्ध करून देत आहे. उद्घाटनावेळी नईम मन्सूरी, आशा तळोजकर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# घबराटीचे कारण नाही

भारताने चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्के प्रभावी जीडीपी वाढ नोंदवली. म्हणजेच भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. परंतु मजबूत जीडीपी आकडे देखील रुपयाला घसरण्यापासून रोखण्यात अपयशी ठरत आहेत. भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत सकारात्मक हालचाली घडल्यास रुपया सावरण्याची शक्यता आहे.

**भारत-अमेरिका यांच्यातील रखडलेला व्यापार करार, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचे भारतीय शेअर बाजारातून पैसा काढून घेणे आणि डॉलरची वाढती मागणी यामुळे भारतीय रुपयाची घसरण सुरू आहे. पहिल्यांदाच डॉलरच्या तुलनेत रुपया ९० पर्यंत घसरला आहे. एकीकडे प्रभावी जीडीपी आकड्यांमुळे उत्साह पहायला मिळत असताना दुसरीकडे रुपयाची ही घसरण सुरू आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भारतातील शेअर बाजारात नजरेत भरण्यासारखी तेजी दिसत असताना त्या पार्श्वभूमीवर रुपयाच्या घसरणीला फार महत्त्व देऊ नये असेही काही तज्ज्ञ सांगतात. जागतिक राजकारणातील अस्थैर्याचे प्रतिबिंब जागतिक अर्थकारणावर पडणे स्वाभाविकच आहे हेही यासंदर्भात लक्षात घेण्याची गरज आहे. त्यामुळेच काही तज्ज्ञांच्या मते रुपयाने गाठलेली नीचांकी पातळी हे जागतिक अनिश्चिततेच्या परिणामांचे केवळ एक लक्षण आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने नव्वदीचा उंबरठा गाठल्यानंतर या घसरणीविषयी चर्चा होणे स्वाभाविकच आहे. परंतु चलनाची घसरण ही काही घबराट माजण्यासारखी समस्या नाही. अर्थात सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात आर्थिक आघाडीवर प्रत्येक बाबतीत सावध व जागरूक राहणे आवश्यक आहे व केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खंबीर नेतृत्वाखालील सरकार ही जबाबदारी समर्थपणे सांभाळेल यात शंका नाही. परंतु रुपयाच्या घसरणीच्या मुद्यावर केंद्र सरकारला घेरण्याची आयती संधी विरोधीपक्षांना मिळाली असून यावरून राजकारण केल्याशिवाय ते स्वस्थ बसणार नाहीत. आणखी काही महिने भारतीय रुपया कमकुवत राहण्याची शक्यता आहे. पण अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत सकारात्मक हालचाली घडल्यास रुपया सावरण्याचीही शक्यता आहे असे सांगितले जाते. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या अनिश्चिततेमुळेच शेअर बाजारात अस्वस्थता आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. भारतीय शेअर बाजारातून २०२५मध्ये परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेतली जात आहे. देशांतर्गत गुंतवणूकदारांमुळे त्याचा मोठा फटका आपल्याला जाणवलेला नाही. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी १.४८ लाख कोटी रुपयांचे शेअर विकले आहेत. भारतीय रुपयामध्ये चालू वर्षात सुमारे ४.४ टक्क्यांची घसरण होण्यामागील हे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. आरबीआयचा मर्यादित हस्तक्षेप हेही रुपया कमकुवत होण्यामागचे एक कारण मानले जाते. याशिवाय कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणामही भारतीय चलनावर जाणवत असून जोपर्यंत परकीय गुंतवणूक सुधारत नाही किंवा भारत-अमेरिका व्यापार कराराच्या वाटाघाटी पुढे सरकत नाहीत तोपर्यंत रुपया दबावाखाली राहील असे तज्ज्ञ सांगतात. अमेरिकेने भारतावर लादलेल्या ज्यादा आयातशुल्कामुळे नाही म्हटले तरी भारताच्या निर्यातीत घट झाली असून व्यापारतूट वाढली आहे. रुपयावर दबाव येण्याचे तेही एक कारण आहे. पर्यायी निर्यातीच्या संधी भारत शोधत असला तरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या वाढीव आयातशुल्काचा झालेला परिणाम नाकारता येणार नाही. यातून बाहेर पडायला वेळ लागणार आहे. एकुणात रुपयाच्या घसरणीची चर्चा करायला काहीच हरकत नाही, परंतु लक्ष मात्र त्याहून कितीतरी अधिक महत्त्वाच्या आर्थिक समस्यांवरच असायला हवे आहे.**

# चला माती परीक्षण करूया, आपली जमीन समृद्ध करूया





जागतिक माती दिन अर्थात जागतिक मृदा दिन दरवर्षी ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. मातीचे संवर्धन, सुपिकता तिच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या दिवासाचा उद्देश आहे. जगण्यासाठी मूलभूत गरज असलेल्या अन्नाची आवश्यता आहे, ती मातीतून पिकणाऱ्या अन्न धान्यामुळे पूर्ण होते. जमिनीमधील मातीचे परिक्षण करुन योग्य पद्धतीने उत्पादन घेतले तर पिकांचे उत्पादन वाढेल. शेतातील माती निरोगी असेल तर समृद्ध शेती होईल. त्यासाठी मातीचे परिक्षण करुन समृद्धता वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे तुम्ही जर शेतकरी आहात, तुमच्याकडे जमीन आहे तर तुम्ही माती परीक्षण केले पाहिजे. चल, आपली माती आणि तीची गुणवत्ता जाणून घेऊ या!.

### मातीचे महत्त्व

अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. माती विना शेती शक्य नाही त्यामुळे निरोगी माती ही समृद्ध शेतीसाठी अत्यंत आवश्क आहे. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली, तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करता येत नाही, हे वास्तव आहे. १० सेंटीमीटर मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात त्यामुळे मातीचे महत्त्व पर्यावरण आणि सजीवांच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.

### माती संवर्धन काळाची गरज

आरोग्यदायक माती हा आरोग्यदायी अन्न निर्मितीचा पाया आहे. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैवविविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी साठविण्याची आणि ते शुद्ध करण्याची क्षमता आहे, तसेच पूर व दुष्काळासारख्या संकटालाही मातीमुळे मात मिळते. विविध वनस्पतींच्या लागवडीसाठी किंवा अन्न, वस्त्र (कापूस, ताग सारखे विविध धागे) इंधन आणि औषधी वनस्पतींच्या व्यवस्थेसाठी माती मूलाधार आहे. मातीतील विविध घटक कर्बचक्रात महत्त्वाची भूमिका बजावतात. वातावरणातील बदल सहन करणे आणि तो सौम्य करणे यासाठी माती सहाय्यभूत ठरते. जल व्यवस्थापन आणि पूर व दुष्काळ या आपत्तींना तोंड देऊन परिस्थिती पूर्वपदावर आणण्यातही मातीतील विविध घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. अन्न सुरक्षा आणि शाश्वत भवितव्य मातीवरच अवलंबून असल्याने मातीचे संरक्षण, शाश्वत संवर्धन काळाची गरज आहे.

### माती संवर्धन उपाय

माती संवर्धनासंदर्भातील उपाययोजनांसाठी महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान मातीचे नमुने गोळा करण्याबाबत पंधरवडा मोहिम राबवित आहे. यानुसार राज्यातील १० लाख ८० हजार शेतकऱ्यांच्या मातीचे परिक्षण करुन जमीन आरोग्य पत्रिका वितरण करण्याचे निश्चित केले आहे. तसेच जिल्हा, तालुका, गावस्तरावर शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वितरीत करुन जमिनीच्या आरोग्य विषयषक, माती परिक्षणाचे महत्त्व, जमीन सुपीकता निर्देशांक व जमीन आरोग्य पत्रिका आधारित खतांच्या संतुलित वापराविषयी, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, सेंद्रीय खत वापराचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कृषी विभाग, जिल्हा परिषद, आत्मा यंत्रणा, कृषी विद्यापीठ, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, नोंदणीकृत खासगी प्रयोग शाळा, कृषी विषयक संस्था इत्यादींच्या सहयोगाने जिल्ह्यांमध्ये ५ डिसेंबर रोजी मृद आरोग्याचे महत्त्व, सॉईल हेल्थ कार्ड, मोबाईल पद्वारे मृद नमुने तपासणी केल्यावर जमीन आरोग्य पत्रिका आधारीत खतांचा संतुलित वापर याबाबत चर्चासत्रे, व्याख्याने कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

### माती परीक्षणाचे फायदे

माती संवर्धनासाठी माती परीक्षण करुन घेऊन त्यानुसार उपयोजना केल्यास त्या फायदेशीर ठरतात त्यामुळे जमिनीतील उपलब्ध घटकांचे प्रमाण समजते. त्यावर आधारीत पिकांच्या गरजेप्रमाणे आवश्यक तेवढेच खत दिल्यामुळे आर्थिक बचत होते. जमिनीच्या प्रतीनुसार पिकांची निवड व नियोजन करता येते. खतांचा संतुलित वापर केल्यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन अधिक उत्पादन मिळते. जमिनीची सुपिकता आजमावता येते. जमिनीतीत काही दोष असतील तर ते देखील समजतात आणि दोषानुसार जमीन सुधारण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येतात.

### माती परीक्षण कसे करावे

शेतकऱ्यांनी कागदावर लिहून तो कागद माती नमुन्याच्या पिशवीत टाकावा.

१) माती नमुना क्रमांक, २) माती नमुना घेतल्याची तारीख, ३) शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, ४) मोबाईल क्रमांक, ५) गाव/पोस्ट, ६) तालुका, ७) जिल्हा, ८) सव्हे /गट क्रमांक, ९) नमुन्याचे प्रातिनिधी क्षेत्र, १०) जमीन प्रकार बागायत/जिरायत, ११) मागील हंगामातील पीक/जात, १२) पुढील हंगामातील पीक/जात, १३) मातीची खोली सें.मी., १४) जमीनीचा उतार, १५) जमीनीची काही विशेष लक्षणे-खारवट, चोपण,आम्ल व इतर, १६) पाण्याचा निचरा बरा/वाईट, १७) माती गोळा करणाऱ्याची स्वाक्षरी घेवून मातीचे नमुने संबंधित गावातील कृषी सहायक/कृषी पर्यवेक्षक/ मंडल कृषी अधिकारी यांच्यामार्फत किंवा शेतकऱ्यांनी स्वत: जिल्हा मृद चाचणी प्रयोग शाळेकडे वरील प्रमाणे माहिती भरुन पाठवावा.

### मातीचा नमुना केव्हा व कोठे घ्यावा?

मातीचा नमूना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी (सेंद्रीय व रासायनिक खते देण्यापूर्वी) व खते दिल्यानंतर तीन महिन्यांनी घ्यावा. मातीचा रंग, जमिनीचा खडकाळपणा, उंच- सखलपणा, पिकातील फरक व बागायत / जिरायत स्थिती लक्षात घेऊन त्याप्रमाणे शेतीचे वेगवेगळे भाग पाडावेत व त्या प्रत्येक भागाला विशिष्ट क्रमांक द्यावेत. प्रत्येक भागाचा वेगळा नमूना घेण्यात यावा.

### खालील ठिकाणांहून मातीचे नमूने घेऊ नयेत

गुरे बसण्याची व झाडाखालची जागा, खते व कचरा टाकण्याची जागा, दलदल व घराजवळची जागा, पाण्याच्या पाटाजवळील जागा, बांधाजवळचे क्षेत्र, झाडाझुडाचे क्षेत्र याठिकाणचे माती नमूने टाळावेत.

### जमीन सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना

जमिनीचा चोपणपणा वाढत आहे. त्यासाठी उतारास समांतर चर काढून पाण्याचा निचरा होईल अशी काळजी घ्यावी. हेक्टरी ५ ते १० टन जिप्सम पूड व १५ ते २५ गाड्या चांगले कुजलेले खेणखत जमिनीत मिसळून घालवे. हिरवळीच्या खतासाठी ताग, धैंचा, शेवरी सारखी पिके घेऊन फुलावर येताच जमिनीत गाडावीत. भात, कापूस, गहू, शेवरी यासारखी पिके घ्यावीत. जमीनीच्या पृष्ठावर आलेले क्षार खरवडून शेताबाहेर टाकून द्यावे. जमिनीचे लहान वाफे करुन त्यात थोडा वेळ वाफा भरुन पाणी साठवून एकदम चरावाटे बाहेर काढून टाकावे, म्हणजे पाण्याबरोबर क्षार बाहेर जातील. सेंद्रीय खतांचा भरपूर प्रमाणात वापर करावा. क्षारास दाद देणारी पिके कांदा, भात, कापूस, सूर्यफुल, शेवरी सारखी पिके घ्यावीत. क्षार संवेदनशिल पिकांची लागवड करु नये, पिकांची लागण सरीच्या कुशीत करावी. क्षारास दाद देणारी पिके घ्यावीत व पिकांची नियमीत फेरपालट करावी. जास्त प्रमाणात सेंद्रीय व हिरवळीची खते वापरावीत.पिकास योग्य वेळी थोडे थोडे पाणी द्यावे.पाण्याच्या अतिवापरामुळे क्षारांचे प्रमाण वाढल्यास माती परिक्षणानुसार जिप्समची मात्रा ठरवून त्याचा वापर करावा. चांगल्या व मचुळ पाण्याचा एकत्रित वापर करावा.

वरील पद्धतींचा अवलंब करुन आपल्या शेतीचे आणि शेतीतील मातीचे योग्य परीक्षण झाले पाहिजे. शेत जमिनीत खतांचा, पाण्याचा योग्य वापर, जमिनीला आवश्यक असणाऱ्या पिक पद्धतीचा वापर करुन शेतीची सुपिकता मातीची समृद्धता टिकवून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**-रणजित पवार,** उपसंपादक,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

## बदलते तंत्रज्ञान



# स्मार्टफोनचं स्टोरेज फुल झालंय? अशी करा स्पेस

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे, मात्र सगळ्यांनाच त्रास देते स्टोरेज फुल! फोनची मेमरी भरली की



त्याची गती मंदावते, तो हँग होऊ लागतो आणि मग फोन वापरताना त्रास होतो. फक्त काही लपलेल्या सेटिंग्ज आणि तंत्रज्ञानातील सोप्या ट्रिक्स वापरा आणि पाहता पाहता फोन होईल पुन्हा चपळ, झपाट्याने काम करणारा.

फोनची स्टोरेज रिकामी करणाऱ्या चार कमाल ट्रिक्स (यातील तिसरी ट्रिक तर बहुतेकांना माहीतच नसते!)

१) ॲपचे Cache त्वरित साफ करा – मोठा स्पेसचोर!

आपल्या फोनमधील अनेक ॲप्स वापरल्यावर त्यांच्या उरलहश फाइल्स वाढत जातात. या तात्पुरत्या असल्या तरी काही दिवसांतच त्या शेकडो चइ जागा खाऊन टाकतात.

२) न वापरणाऱ्या ॲप्सना करा 'Goodbye'-डेटा मात्र राहील सुरक्षित!

बऱ्याच मोबाईलमध्ये Offload Apps नावाचे फीचर असते. हे फीचर ॲप हटवते, पण त्यातील डेटा तसाच सुरक्षित ठेवते. त्यामुळे तुम्ही नंतर पुन्हा ते ॲप इन्स्टॉल केले तरी सर्व डेटा तुम्हाला तसाच पुन्हा मिळतो.

वापरात नसलेले गेम्स, जुने सोशल ॲप्स, क्वचित वापरातील टूल्स हटवा, त्यामुळे फोन हलका आणि मोठ्या प्रमाणात जागा मोकळी होते.

अनेक वापरकर्त्यांना ही ट्रिक माहितीच नसते आणि त्यामुळे त्यांच्या फोनची मेमरी अनावश्यकपणे भरून राहते

३) Downloads फोल्डरमध्ये लपलेल्या 'जम्बो फाइल्स' डिलीट करा

आपण जे काही डाऊनलोड करतो त्या PDFs, मोठे व्हिडीओ, मीम्स-ते सर्व Downloadsमध्ये साठत राहतात. महिने- महिने तिथेच पडून राहिलेल्या फाइल्स जागा खाऊन टाकतात.

४) Recycle Bin/Trash रिकामा करा – लपलेला खजिना! अनेकांना वाटतं की, फाइल डिलीट केली म्हणजे ती गेली, पण नाही! ती ३० दिवसांपर्यंत Recycle Binमध्ये जागा अडवून बसते. Gallery-Trash किंवा Photos-Bin पूर्णपणे रिकामी करा शेकडो MB जागा एका क्षणात मोकळी होईल.

# आज भारतीय नौदल दिन



सन १९७१मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध जिंकलेल्या भारतीय नौदलाचे सामर्थ्य आणि शौर्य लक्षात ठेवण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी भारतीय नौदल दिन साजरा केला जातो.

४ डिसेंबर १९७१ रोजी 'ऑपरेशन ट्रायडंट' अंतर्गत भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची नौदल तळावर हल्ला केला. या ऑपरेशनचे यश लक्षात घेऊन दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. जंग-ए-आझादी, मुंबईतील ऑपरेशन ताजपासून ते इतर अनेक घटनांपर्यंत भारतीय नौदलाचा इतिहास कर्तृत्वाने भरलेला आहे.

नौदल ही भारतीय लष्कराची सागरी शाखा आहे, जी १६१२मध्ये स्थापन झाली. ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या जहाजांचे संरक्षण करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी मरीन म्हणून एक सैन्य उभे केले, ज्याचे नंतर रॉयल इंडियन नेव्ही असे नामकरण करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, १९५०मध्ये नौदलाची पुनर्रचना करण्यात आली आणि तिचे भारतीय नौदल असे करण्यात आले.

या दिवशी अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जातात आणि दरवर्षी नौदल दिन साजरा करण्यासाठी वेगळी थीम ठरवली जाते. नौदल दिन त्याचा इतिहास आणि त्याचे महत्त्व याबद्दल अधिक जाणून घेऊयात.

**निमित्त**

### भारतीय नौदल दिनाचा इतिहास

जगातील पाचव्या क्रमांकाच्या या नौदलाने १९७१च्या बांगलादेश मुक्ती युद्धात पाकिस्तानच्या कराची बंदरावर जोरदार बॉम्बफेक करून उद्ध्वस्त केले. ४ डिसेंबर १९७१ रोजी ऑपरेशन ट्रायडंट नावाने सुरू करण्यात आलेल्या मोहिमेत मिळालेल्या यशामुळे दरवर्षी ४ डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. १९४५ पासून दुसऱ्या महायुद्धानंतर १ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात होता, मात्र नंतर तो १५ डिसेंबर १९७२पर्यंत साजरा करण्यात आला. त्यानंतर १९७२पासून फक्त ४ डिसेंबरला नौदल दिन साजरा केला जात आहे. नौदल दिनाच्या दिवशी भारत-पाकिस्तान युद्धात मारले गेलेल्यांचे स्मरण केले जाते आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. भारतीय नौदल ही भारतीय सशस्त्र दलांची नौदल शाखा आहे ज्याचे नेतृत्व भारताचे राष्ट्रपती कमांडर-इन-चीफ म्हणून करतात. मराठा सम्राट, छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय नौदलाचे जनक मानले जाते.

भारतीय नौदलाची स्थापना १६१२मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने केली होती. नंतर त्याला रॉयल इंडिया नेव्ही असे नाव देण्यात आले आणि स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये भारतीय नौदल म्हणून त्याची पुनर्रचना करण्यात आली. पाकिस्तानविरुद्धच्या विनाशकारी युद्धानंतर संपूर्ण देशाने भारतीय नौदलाच्या यशाचा जल्लोष साजरा केला.

भारतीय नौदलाची सुरुवात ईस्ट इंडियाच्या काळात झाल्याचं मानण्यात येतं. ईस्ट इंडिया कंपनीनं आपल्या व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी नौदलाची एक टीम तयार केली. नंतर याचं नामकरण रॉयल इंडियन नेव्ही असं करण्यात आलं. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५० साली रॉयल इंडियन नेव्ही हे नाव बदलण्यात आलं आणि भारतीय नौदल अर्थाच इंडियन नेव्ही असं ठेवण्यात आलं.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यातील सर्दी खोकल्यावर कापूराचा असा करा वापर

थंडी, धूळ, प्रदूषण आणि सततचा ताण या सगळ्यांचा परिणाम आपल्या श्वसनावर, शरीरावर सहज होतो. अशा वेळी एक छोटा, साधा उपाय अनेकांना आराम देतो तो म्हणजे रुमालात थोडा कापूर ठेवून फिरणे. कापूर हे भारतीय संस्कृतीतील अत्यंत परिचित आणि उपयोगी घटक आहे.



त्याचा सुगंध जसा ताजेतवाना करतो, तसाच त्याचा आरोग्यावरही सूक्ष्म आणि सकारात्मक परिणाम होतो.

कापूराचा सुगंध हवेत क्षणात पसरतो आणि श्वसनमार्ग स्वच्छ करतो. नाक बंद होण्याची प्रवृत्ती, धूळ किंवा थंड वाऱ्यामुळे होणारी जडत्वाची भावना कमी करण्यासाठी हा सुगंध सौम्यपणे मदत करतो. दिवसभर बाहेर फिरताना किंवा प्रवास करताना कापूराचा तुकडा जवळ असणे म्हणजे वातावरणातील घाणेरडे वास, धूर कमी करणारा छोटासा आधार. काही लोकांना थकवा जाणवला, अचानक चक्कर आली किंवा मनावर ताण आला तरही कापूराचा तीव्र पण स्वच्छ सुगंध सहज उभारी देतो. त्यामुळे रुमालात ठेवलेला कापूर हा एक प्रकारे मानसिक आणि श्वसनात्मक दोन्ही बाजूंनी फायदा देतो. श्वसनासाठी कापूर फार उपयुक्त असतो.

कापूर हा नैसर्गिकरित्या जंतुनाशक गुणांनी परिपूर्ण आहे. तो सहज हवेत पसरतो, त्यामुळे त्याचे कण हवेतील सूक्ष्म कीटक आणि दुर्गंधींवर परिणाम करतात. याच कारणामुळे घरात, देवघरात किंवा मुलांच्या खोलीत कापूर ठेवण्याची किंवा जाळण्याची परंपरा आहे. त्यातून मिळणारा सुगंध वातावरण शुद्ध करतो आणि घरात एक सकारात्मक, शांत ऊर्जा निर्माण करतो. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून कापूर कफ-नाशक मानला जातो. त्याची थंड आणि स्वच्छ करणारी प्रवृत्ती मनातील ताण कमी करते, एकाग्रता वाढवते आणि बेचैनीवर नियंत्रण आणते.

दैनंदिन आयुष्यात कापूराची उपयुक्तता अनेक प्रकारे दिसते. सर्दी-खोकल्याच्या त्रासापासूनही कापूर आराम देतो. ज्यामुळे कफ सुटतो आणि श्वास घेणे सोपे होते. काही जण घरात कापूर जाळून हवेतली ओलसर दुर्गंधी दूर करतात आणि कीटकांना दूर ठेवतात. स्नायूंमध्ये वेदना असेल तर कापूरयुक्त तेलाचा सौम्य मसाज आराम देतो. कापराचे तेल डोक्याला लावणे आरामदायी असते. तसेच लहान मुलांच्या डोक्यातील उवा कमी करण्यासाठी हे तेल एकदम उपयुक्त ठरते.

# मतदान यंत्रांवर 'सीसीटीव्ही'ची नजर

- स्ट्रॉंग रूममध्ये ईव्हीएम सीलबंद
- चोख पोलीस बंदोबस्त तैनात




**मुरूड : प्रतिनिधी**


मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणुक २ डिसेंबर २०२५ या दिवशी सकाळी ७.३० ते ५.३० वाजताच्या दरम्यान झाली. वापरण्यात आलेल्या मतदान यंत्रे स्ट्रॉग रुम सील बंद करण्यात आले.

सायंकाळी ५.३० नंतर सर्व मतदान केंद्रावर केंद्राध्याक्षांनी उमेदवारांच्या प्रतिनिधी समोर वापरण्यात आलेल्या ईव्हिएम मशीन सील करण्यात आले. तद्रंतर सर्व केंद्राध्यक्ष यांनी दरबार हॉल येथे सर्व ईव्हिएम मशीन आणल्या नंतर तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी यांनी मोठ्या पत्राच्या पेटीत ईव्हिएम मशीन ठेऊन निवडणूक निर्णय अधिकारी- आदेश डफल, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बच्छाव व पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे व उमेदवारांच्या उपस्थित मतदान यंत्रे सील बंद करुन कडक पोलीस बंदोबस्तात तहसीलदार कार्यालयातील स्टाँग रुममध्ये आणण्यात आले.

तद्रंतर स्ट्राँग रुम सील बंद करण्यात आले. आता या ठिकाणी व परिसरात २४ तास सिसिटीव्ही कॅमेरे ची नजर असणार आहे त्या बरोबर पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली १० एस आर पी पोलीस, आठ जिल्हा पोलीस व दोन अधिकाराची नेमणूक करण्यात आली आहे.

या वेळी शिवसेना शिंदे गट, उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप पक्षांचे या पक्षाचे उमेदवार व उमेदवाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुरूड नगरपरिषद निवडणुकीत एकूण मतदार ११ हजार ५४४ मतदारांनी ८५३० लोकांनी मतदान केले आहे. शिवसेना विरूद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये मुख्य लढत झाली आहे. त्यामुळे निकालाची उत्सुकता आता सर्वांना लागली आहे.

# निवडणूक मतमोजणी लांबल्याने निकालाच्या अंदाजांना उधाण



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीचे मतदान झाले. आज होणारी मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याने उमेदवारांसह कार्यकर्ते सुद्धा नाराज झाले, मात्र आता अठरा दिवस निकालाची वाट बघावी लागणार असल्यामुळे कोण निवडून येणार? असे अंदाज चौका चौकात बांधले जात आहेत. निवडणुकीचा निकाल लागे पर्यंत 'अंदाज पंचे दाहो दर्षे' सुरूच राहणार आहे.

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीत ७२.३७ टक्के मतदान झाले. एरव्ही पेक्षा या वेळी मतदारांनी उत्साह दाखवल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढली आहे. निवडणूकीच्या काळात कार्यकर्त्यांची प्रचार करताना धावपळ झाली. मतदानाच्या दिवशी मतदान करून घेण्यासाठी त्यांनी मेहनत घेतली. काहींच्या मधे वादावादी झाली. दुसऱ्या दिवशी मेहनतीचे फळ मिळेल म्हणून उमेदवारासाठी जीवाचे रान करून काम करीत असतानाच निवडणुकीची मतमोजणी लांबणीवर गेली. त्यामुळे कार्यकर्त्यां बरोबरच उमेदवारांनाही एक प्रकारे झटकाच बसला. मतदान शांततेत पूर्ण झाले. अगदी नवरीनेसुद्धा आधी मतदान केले आणि मग विवाह सोहळ्यासाठी गेली. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने किरकोळ वादवादीच्या पुढे काही झाले नाही.

निवडणुकीची मतमोजणी पुढे गेल्याने आज सकाळ पासूनच चौका चौकात कार्यकर्ते व मतदार कोण निवडून येणार? किती फरकाने निवडून येणार, असे अंदाज व्यक्त करताना दिसत आहेत. कुणी म्हणतय मतमोजणी मुद्दाम पुढे नेली. कुणी म्हणतय मतमोजणी करून घ्यायला पाहिजे होती तर कुणी म्हणतय आता मात्र निकालाचे काही सांगता येत नाही.

ईव्हीएम मशीनमध्ये काही तरी होईल आणि निकाल त्यांच्या मनासारखे लागतील. आरोप प्रत्यारोपांना उधाण येईल. हे असेच आता पंधरा दिवस सुरू राहील. मतमोजणी ठरल्या तारखेला झाली असती तर आज कोण नगराध्यक्ष, कोण नगरसेवक ते समजले असते.

# मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानात चौक ग्रामपंचायतीचे नावीन्यपूर्ण उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामीण भागातील ग्रामपंचायती यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आलेले एक अभियान आहे. हे अभियान सन २०२५-२६ पासून सुरू झाले असून, सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, लोकसहभाग आणि श्रमदान अशा सात प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या अभियानाचा उद्देश आहे. यासाठी खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत चौक यांनी पूरेपूर काम करण्यासाठी तयारी सुरु केली असून चौकचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

सुशासन युक्त पंचायत अभियानासाठी सेवा ऑनलाईन देणे, तक्रार निवारण केंद्र स्थापन व तक्रारींचे निवारण करणे. ग्रामपंचायत माहिती वेबसाईटवर प्रसिद्ध करणे. सीसीटीव्ही बसवणे, ग्राम पंचायत दप्तर अद्ययावत व लेखा परीक्षण करणे. ग्रा.पं.सर्व सभा तहकुब न होता त्याची नोंदवही अद्ययावत करणे.

ग्रामविकास समिती कामकाज कलम ४९ अंतर्गत विविध समित्यांचे कामकाज सभा निहाय पार करणे. नागरिकांमधील जागरुकता वाढविणेसाठी निर्णय घेऊन मेरी पंचायत व ग्रामसंवाद ॲप डाऊनलोड करणे. आयुष्यमान भारत कार्ड उपलब्ध करून देणे. अनिवार्य बाबीं वरील तरतूद व खर्च ५%, १०%, १७% या अनिवार्य बाबींवरील खर्च १००% करून त्याचा लाभ सर्वांना देण्याचा प्रयत्न करणे. दिव्यांग यांना ओळखपत्र व UDID कार्ड उपलब्ध देणे. यासारख्या उपाययोजना केल्या जात आहेत.

नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी ऑनलाईन तक्रार निवारण पोर्टल व्हॉट्सॲप बॉट (ट्रॅकिंग आयडीसह), ग्रामसभा लाईव्ह स्ट्रीम व रेकॉर्डिंग सह माहिती उपलब्ध करणे, भू-नकाशे (GIS) आधारित मालमत्ता कर मॅपिंग, प्लास्टिकमुक्ती, हरित छप्पर, शाळा डिजिटल लॅब, विद्यार्थी शिकवणी बँक, कौशल्यविकास कॅलेंडर, स्थानिक ई-मार्केटप्लेस, पर्यटन/वारसा वॉक, लिंग साक्षरता व जेंडर बजेटिंग, घरगुती हिंसा/सायबर फसवणूक हेल्पडेस्क वृद्धांसाठी नियमित आरोग्य तपासणी शिबिर, ग्राम आपत्ती किट स्वयंसेवक दल या सारखी कामे योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

सरपंच रितू ठोंबरे, उपसरपंच पूजा हातमोडे व ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे हे आपले सहकारी, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या सह मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान यशस्वी करण्यासाठी झटत आहेत.

# डीजीटी महाविद्यालयात एड्स दिनानिमित्त जनजागृती

**माणगाव : प्रतिनिधी**

रेड रिबन क्लब व माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती करण्यासाठी सोमवारी विविध तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व्याख्याने, पथनाटय, पोस्टर मेकींगचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे व डॉ. बी.एम. खामकर यांच्या मार्गदर्षनाखाली पार पडला. या प्रसंगी समुपदेषक प्रिया निवाते म्हणाल्या की, 'एड्स' हा महाभयंकर आजार आहे. त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे त्यांचे निमूर्लन करण्यासाठी संयम, सावधगिरी आणि लोकजागृती करण्याची नितांत आवश्यकता आहे.

या वेळी प्रयोगशाळा तंत्रज्ञ आरती राजपूत, रोशन पाबरेकर, आजिवन अध्ययन आणि विस्तार विभाग विभागप्रमुख प्रा. मेहरीन डावरे व राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. नेहा तुराई, प्रा. डॉ. पाण्डेय जे. आर, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. विशाखा पवार, प्रा. श्वेता सकपाळ, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. पंकज गायकवाड आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



# मोरे महाविद्यालयाचा आविष्कार संशोधन महोत्सवात सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**



मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील आविष्कार संशोधन महोत्सवाच्या रायगड जिल्हा विभागीय स्पर्धेचे आयोजन रविवारी ३० नोव्हेंबर रोजी सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, खारघर येथे करण्यात आले. जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयानी यात आपला सहभाग नोंदविला.

एम बी मोरे फाऊंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव, रोहा येथील विद्यार्थिनी चैत्राली सूर्यवंशी (SYBSc) आणि कु शहाना खान (FYBSc) या 'मेडिसीन अँड फार्मसी' या प्रकारात ऐक संशोधन प्रकल्प घेऊन आविष्कार स्पर्धेत सहभागी झाल्या. या संशोधन प्रकल्पाचे विद्यार्थिनीं परीक्षकांसमोर आत्मविश्वासाने सादरीकरण केले आणि त्यांच्या शंकांचे निरसनदेखील केले.

महिला महाविद्यालयाच्या रिसर्च सेलच्या प्रमुख प्रा प्रतिमा भोईर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, खारघर येथे विद्यार्थिनींबरोबर महाविद्यालयाच्या प्रा अक्षता ठाकूर आणि श्री प्रसाद मोरेदेखील सहभागी झाले.

# आडघर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद शाळा, आडघर येथे राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शाळेच्या विकासकामांना गती देणे आणि ग्रामविकासास हातभार लावणे या उद्दिष्टांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत सदस्य श्रावणी संतोष दसवते तसेच तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य पूनम राहुल दसवते, ग्रामपंचायत अधिकारी रूपाली देवरे तसेच कर्मचारी वर्ग आणि अंगणवाडी सेविका मदतनीस व या शाळेचे मुख्याध्यापक संतोष मोहिते व सर्व महिला मंडळ ग्राम आडघर यांच्या सहकार्यातून संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यामध्ये अंगणवाडी, शाळा इत्यादी परिसर स्वच्छ करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद प्रतिसाद मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभियानांतर्गत स्वच्छता उपक्रम, वृक्षारोपण, पोषण-जागृती, डिजिटल साक्षरता, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण यांसारख्या अनेक जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळा स्तरावर घेतलेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्यभावना, सामाजिक सहभाग आणि ग्रामविकासाची समज वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले. ग्रामपंचायत आडघर यांनी अभियानाला पूर्ण सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि सहभागींना गौरविण्यात आले. संपूर्ण उपक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल शाळा आणि ग्रामपंचायत यांच्या कार्याचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# तळा तालुका विज्ञान प्रदर्शनाचे वैज्ञानिक पद्धतीने उद्‌घाटन

**तळा : प्रतिनिधी**

तळा पंचायत समिती शिक्षण विभाग, अ.ल.लोखंडे विद्यामंदिर पिटसई विद्यालय व गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २२ वे तळा तालुका विज्ञान प्रदर्शन अ.ल.लोखंडे विद्यामंदिर पिटसई येथे २ डिसेंबर २०२५ रोजी गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली शानदार उद्‌घाटन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, संस्थेचे विश्वस्त वसंत लोखंडे, महादेव गोळे, सचिव संजय रेडीज,विस्तार अधिकारी मुबीन वासकर, गौतम मनवर, संतोष पटाईत, मुख्याध्यापक अरूण खुळपे, गणित विज्ञान मंडळाचे विनायाक महाडीक, प्रशांत शिंदे शिक्षक संघटना अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक, बालवैज्ञानिक, विद्यार्थी, शिक्षक, साधन व्यक्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी प्रथम गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी प्रास्ताविक करताना या विज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक तयार होत असतात. विद्यार्थी यांची विचार करण्याची वैचारीक पातळी वाढते. लहानपणी न्यूटन यांना फळ झाडावरून खाली का पडला.हा प्रश्न पडला म्हणून गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला अशी जिद्द विद्यार्थ्यांमध्ये असते असेही त्या म्हणाल्या व विज्ञान प्रदर्शनाची माहीती दिली.तद्रंतर संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे यांनी विज्ञान प्रदर्शन महत्व सांगत विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक होऊन आपल्या भागाचा नाव लौकीक करावा असे सूचित केले.

यानंतर अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी यांनी आज विज्ञान प्रदर्शनात मांडलेल्या प्रतिकृती पाहून उद्या आपण ही अस करू हे विद्यार्थ्यांनी करण्याचा प्रयत्न करा. विज्ञान प्रदर्शनातून वैज्ञानिक तयार होण्यास प्रोत्साहन मिळत असते, असे बाल वैज्ञानिकांना सांगितले.

# आंबेघरजवळ मोटरसायकल अपघातामध्ये तरुणाचा मृत्यू

**पेण :** पेण खोपोली मार्गावर पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली असून आंबेघर गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने मोटर सायकलवरील २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. २ डिसेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास पेण-खोपीली मार्गावर खोपोली बाजूकडून पेणकडे येणाऱ्या टीव्हीए ज्यूपिटर या दुचाकीला विरुद्ध दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार राज वसंत पवार (वय २३, रा. गांगळआळी - पेण) याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली तर त्याचा जिवलग मित्र करण चंद्रास प्रसाद हा गंभीर जखमी झाला. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.


## जाहिर नोटीस

सुचना देण्यात येते की, माझे अशिल **श्री. रोहिदास यमाजी घाटविसावे,** त्यांच्या मालकीची **सदनिका क्र. ए टाईप ६८/८, सेक्टर-१३, नवीन पनवेल (पूर्व) ता. पनवेल, जि. रायगड** हि असून यांचे डिड **ऑफ अपार्टमेंट, दस्त क्रमांक १८१३/१९९९ दि. २२/०६/१९९९ हे दि. १५/११/२०२५ रोजी गहाळ** झाले आहे. तरी त्या संर्भातील डिड ऑफ अपार्टमेंट हरवल्य संदर्भात तक्रार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे **FIR No. cAnGHm69sq, दि. ०१/१२/२०२५** रोजी नोंदविण्यात आले आहे. तरी या सदनिकेवर कोणाचीही काही हरकत आल्यास किंवा त्या संदर्भील कुठलाही करार झाल्यास, या सदनिकेचे मुळ दस्त सापडल्यास सदर मिळकती संदर्भातील काही हक्क, हितसंबंध, हिस्सा वा अधिकार असल्यास अशा व्यक्तिंनी खालील पत्यावर संपर्क साधावा. तो सदर जाहिर नोटीस आजच्या प्रसिध्दीच्या तारखे पासून १५ दिवसांच्या आत सादर करावे, अन्यथा सदर मिळकती संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, क्लेम, अधिकार वा बोजा नाही व असल्यास यांनी जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, मागाहून कोणाचीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक - ०३/१२/२०२५**
**ठिकाण - नवीन पनवेल**

**स्वाक्षरी/-**
**ॲड. वृषाली जितेंद्र वाघमारे**
B.A.,B.Ed., L.L.B.
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**हेरिटेज हौ.सो., शॉप नं. ०२,**
**प्लॉट नं. २२, सेक्टर-०५, नवीन पनवेल**
**(पू.)-४१०२०६**
**मो. ९९२०३८३२३२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, **१) श्री. दिलीप बन्सीलाल राठोड २) श्री. नवरतनकुमार बंसीलाल राठोड** यांच्या मालकीची **मौजे जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड, येथील** खालील उल्लेख केलेली जमीन (तेथे असलेल्या बांधकामासहित) माझे आशिल **श्रीमती. शिल्पा एस. परब** हे खरेदी करत आहेत.

| गाव जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड | | |
|---|---|---|
| सर्व्हे नंबर | क्षेत्र (एच-आर-ए) | मूल्यांकन |
| २२/१ | ०-२०-०० | २.१९ |
| एकूण ०-२०-० (एच-आर-ए) | | |

तरी कोणत्याही व्यक्ती/व्यक्तीना सदर वरील उल्लेख केलेल्या मालमत्तेवर वा तिच्या कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षीस, फरोक्त तारण, भाडेहक्क, पोटगी, साठे करार, अखत्यारपत्र वा तस्तम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तीनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा (१४)** दिवसांच्या आत आपला हक्क, हितसबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांच्या पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे,

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावे नाही आल्यास सदर मालमत्ता निर्वेध किंवा बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकाराचा हक्क, दावा हीतसबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मालमत्तेचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या, तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घावी.

**सही/-**
**सुरज प्र. कदम**
**वकील उच्च न्यायालय**

पत्ता :- एफ ३/बी-१ रेनबो अपार्टमेंट से. १० वाशी नवी मुंबई, मो. ९८३३९६८९११


# साजगाव येथे आरोग्य शिबिर आणि भजन स्पर्धेचे आयोजन

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

ब्रम्हलीन गुरुवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाशीर्वादाने तसेच गुरूवर्य ह.भ.प. तानाजी महाराज कर्णूक यांच्या मार्गदर्शनाखाली वैकुंठवासी ह.भ.प.भाऊ महाराज पाटील उंब्रेकर यांच्या ६० व्या पुण्यस्मरण निमित्ताने ६ व ७ डिसेंबर रोजी धाकटी पंढरी साजगाव येथे महाआरोग्य शिबिर व रायगड जिल्ह्यातील नामांकित भजन मंडळ व स्थानिक भजन मंडळ यांच्यासाठी भव्य दिव्य भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक २१००० व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १५००० व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ११००० व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ७००० व सन्मानचिन्ह, पाचवे क्रमांक ५००० व सन्मानचिन्ह तसेच स्थानिक भजन स्पर्धा प्रथम क्रमांक १०००० व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक ७००० व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५००० व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ३००० व सन्मानचिन्ह, पाचवे क्रमांक २००० व सन्मानचिन्ह देण्यात येणार असून उत्कृष्ट गायन, उत्कृष्ट तबला वादन, उत्कृष्ट पखवाज वादन, उत्कृष्ट टाळ वादन यांस प्रत्येकी १००० व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच रायगड जिल्ह्यातही वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकान, भजनी गायक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचा या वेळी गौरव करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे आयोजक ह.भ.प.भगवान बाळकृष्ण पाटील यांनी केले असून या स्पर्धेत आतापर्यंत ५० भजनी मंडळांनी आपली नोंदनी ऑन लाईन केल्याचे सांगितले आहे. तसेच ह्या कार्यक्रमासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वारकरी संप्रदाय व नागरिकांना केले आहे.

# हरवंडी गावात घराला आग

## लाखोंचे नुकसान

**माणगाव : प्रतिनिधी**

हरवंडी गावातील परशुराम मानकर यांच्या घराला मंगळवार दिनांक २ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. या भीषण आगीत घरातील साहित्य जळून खाक झाले असून अंदाजे लाखोंचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागल्याची माहिती मिळताच हारवंडी ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

यामध्ये ग्रामीण वस्ती सेवा एस.टी. कर्मचारी अशोक आगाव आणि संभाजी कोंडे यांनी धाडसाने पुढाकार घेऊन आग विझविण्यात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या तत्परतेमुळे आग मोठ्या प्रमाणात पसरून अधिक हानी होण्यापासून बचाव झाला.

दरम्यान, आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून स्थानिक प्रशासनाकडून पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे. गावकऱ्यांच्या मदतीमुळे आणि सतर्क नागरिकांच्या प्रयत्नांमुळे मोठी आपत्ती टळल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# पाटोळे परिवारातर्फे गरजू रुग्णांसाठी औषधदान

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील दानशूर आणि कष्टाळू पाटोळे परिवाराने पुन्हा एकदा समाजाप्रती असलेली आपुलकी, ममत्व आणि जिव्हाळा सिद्ध केला आहे. गरजू रुग्णांसाठी सदैव तत्पर असणाऱ्या या कुटुंबाकडून उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे जीवनावश्यक औषधसामुग्रीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला.

आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त कुटुंबाने १००० सलाईन बॉटल्स, ४५० इंजेक्शन्स, २०० आयव्हीसेट्स अशी अनमोल देणगी देत समाजासाठी नवा आदर्श निर्माण केला. कष्ट, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर उभ्या राहिलेल्या दशरथ पाटोळे व दर्शना पाटोळे या दांपत्यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित करून सक्षम बनवले. त्यांच्या सहानुभूतीची, समाजकार्यातील निष्ठेची शिकवण दोन्ही मुलांच्या रगारगात भरली आहे.

दान केलेली औषधे कर्तव्यदक्ष अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे यांच्या ताब्यात देण्यात आली. या वेळी हॉस्पिटल कर्मचारी अनिल तेटगुरे, रुपेश पाटोळे, तेजस पवार तसेच संतोष- संगीता सिताराम खाडे उपस्थित होते.



# पामबीच मार्गावर भुयारी मार्ग ठरणार उपयुक्त

## सानपाडा-मोराज चौकातील वाहतूक कोंडी फुटणार




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सानपाडा-सोनखारमधील सेक्टर १९ येथील केसर सॉलीटेअर येथून पामबीच मार्गाखालून वाहनचलित भुयारी मार्गाच्या निर्मितीला हायकोर्टाची परवानगी प्राप्त झाली आहे. त्यामुळे सानपाडा येथे होणारी वाहतूक कोंडी लवकरच फुटणार आहे.

सानपाडा विभागातील स्थानिक माजी नगरसेविका वैजयंती भगत व रुपाली भगत यांनी महापालिकेकडे वनविभागाकडे सातत्याने आपली मागणी लावून धरली होती. जनहिताच्या बाजूने लागलेल्या या निर्णयामुळे दोन्हीही माजी नगरसेविकांनी उच्च न्यायालयासह राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांचे विशेष आभार मानले आहेत, सोबतच याकामी जलद कार्यवाही करणारे नवी महापालिका आयुक्त यांच्यासह जनतेने दिलेल्या भक्कम पाठिंब्याबद्दल आभारी आहोत, अशी प्रतिक्रिया दिली.

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या परवानगीमुळे आता नवी मुंबई महापालिकेस आता वन विभागाच्या हरकतविना येथे भुयारी मार्गाच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे. पामबीचलगत असलेल्या मोराज सोसायटीसमोरील चौकात प्रतिदिन वाहतूक कोंडीतून आता सोनखार -पामबीच विभागातील सेक्टर १, १३ ते १९ सेक्टर्समधील रहिवासीयांसह संपूर्ण सानपाडा नोडमधील सानपाडा गाव, सेक्टर २ ते सेक्टर ११वासीयांना तसेच जुईनगरमधील रहिवासीयांना दैनंदिन वाहतूक कोंडीतून कायमची मुक्ती मिळणार आहे.

भुयारी मार्गाचा हा प्रकल्प सीआरझेड क्षेत्रात येत असल्याने बांधकामासाठी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी आवश्यक असून नवी मुंबई महापालिकेने परवानगी मिळावी म्हणून हायकोर्टात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. प्रकल्पासाठी कोणतेही कांदळवन तोडण्यात येणार नाहीत तसेच सीआरझेड कायद्याचे उल्लंघन होणार नसल्याचे न्यायालयाने नमूद करत दोन वर्षांपूर्वी टेंडर झालेल्या या भुयारी मार्गाच्या प्रकल्पाला परवानगी दिली व ही याचिका निकाली काढली.

# सानपाडा येथील बसस्टॉपची दुरूस्ती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम अंतर्गत सानपाडा येथील जुना पोलीस ठाणे समोर नवीन बस स्टॉप उभे केले आहे, मात्र सदर बस स्टॉप केल्यानंतर कित्येक महिने तो बस स्टॉप प्रवाशी विशेषतः जेष्ठ नागरिक, मुले आणि महिलासाठी असुरक्षित होता. शिवसेना नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख मिलिंद सुर्यराव यांनी सदर बस स्टॉपचे लादीकरण करून तो दुरुस्त करावा अशी मागणी परिवहन प्रशासनाकडे केली होती. याची दखल घेत प्रशासनाने तो दुरुस्त करून प्रवाशासाठी सुरक्षित केला आहे.



सानपाडा येथील सदर बस स्टॉप परिवहन उपक्रमाने उभा केल्यानंतर बस कित्येक महिने सदर स्टॉपचाखालील भाग हा उंच सखल होता. परिणामी, नागरिकांना तिथे उभे राहण्यास त्रास होत होता. तसेच त्या पोलचे नटबोल्टसुद्धा उघडे असल्याचे दिसून येत होते. प्रवाशांना बसताना किंवा चालताना धोक्याचे होते कारण त्या उघड्या नट बोल्ट वर एखादा प्रवासी अडखळून पडल्यास मोठ्या प्रमाणात इजा होऊ शकली असती. त्यामुळे येथे प्लॅटफॉर्म दुरुस्त करून नागरिकांना सुविधा व सुरक्षितता प्राप्त करून द्यावी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्यराव यांनी परिवहन विभागाचे व्यवस्थापक योगेश कडूसकर यांच्याकडे प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली होती.

शिवाय आसन व्यवस्था ही जमिनीपासून उंच असून त्यामुळे ज्येष्ठ महिला तसेच लहान मुलांना बसताना अडचण होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले होते. त्यामुळे जे नवीन बस स्टॉप उभे केले आहे त्या ठिकाणी एकसंध प्लॅटफॉर्म तयार करावा. उघडे असलेले नटबोल्ट हे काँक्रीटने झाकून त्याच्यावर लादी बसवण्यात यावी जेणेकरून प्रवाशांना होणारा त्रास कमी होईल. होणाऱ्या अपघातापासून बचाव होईल, अशी मागणी केली होती. याची दखल घेत लादीकरणं करून सर्व सुरक्षा परिवहन विभागाने केल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

## निवडक

### रविवारी मराठा कृतज्ञता मेळावा

**पनवेल :** मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील रविवार, ७ डिसेंबर २०२५ रोजी पनवेलच्या ऐतिहासिक भूमीत दाखल होणार आहेत. सकल मराठा समाज मंडळ खांदा वसाहत येथे रविवारी सायंकाळी ५ वाजता मराठा भवन उदघाटन व मराठा कृतज्ञता मेळावा या कार्यक्रमानिमित्त मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील येणार आहे. या कार्यक्रमासाठी पनवेल मधील आपण सर्व समाज बांधवानी आवर्जून उपस्थित राहावे व समाज कर्तव्य बजवावे अशी आग्रहाची विनंती संतोष जाधव यांनी केली आहे.

### बेवारस मृतदेह आढळला

**पनवेल :** परिसरात एका बेवारस व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. बेवारस व्यक्तीचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, रंग सावळा, चेहरा उभट, अंगात लाल शर्ट व काळी फुल पॅन्ट आहे. यांच्याबाबत माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर (९११७९६६५५५) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एमएनएम विद्यालयाची न्हावा येथे क्षेत्रभेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय तुकाराम नारायण घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांच्या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट१९१२मध्ये सर मोहम्मद युसूफ यांनी स्थापन केलेल्या मरीन म्युझियम न्हावा येथे आयोजित करण्यात आली.

या वेळी म्युझियम क्युरेटर औरांजीत यांनी टी एस रहमान संस्थेच्या उभारणीचा इतिहास थोडक्यात सांगितला. म्युझियम मध्ये एकूण१३ गॅलरी आहेत ज्या सागरी संग्रहालयाच्या समृद्ध वारशाचे उदाहरण देतात. या गॅलरींमध्ये हेरिटेज गॅलरी, ब्रिटिश आणि मराठा गॅलरी, वाडिया गॅलरी, कंट्री क्राफ्ट बोट डिस्प्ले, इकोलॉजी गॅलरी, बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन गॅलरी, टी एस रहमान गॅलरी, सर मोहम्मद युसूफ गॅलरी, इकोलॉजिकल गॅलरी, सिंधिया गॅलरी या भारतीय शिपिंग संबंधित संस्थेचा समृद्ध वारसा आणि इतिहास प्रदर्शित करतात, असेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी जहाज बांधणी, सौर ऊर्जा प्रकल्प, जेट्टी, उद्यान, टी एस रहमान शैक्षणिक संकुलाचा परिसर पाहून आनंद व्यक्त केला. शाळेचे सहाय्यक शिक्षक संतोष पवार, अविनाश कजबजे यांनी विशेष परिश्रम घेत क्षेत्रभेटी भेटीत सहभाग नोंदवला.

# बस चालक, मालकांची वैद्यकीय तपासणी



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल वाहतुक शाखेतर्फे हद्दीतील स्कूल बस चालक व मालक यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

पोलीस उपायुक्त वाहतुक नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली नविन पनवेल वाहतुक शाखा येथील वपोनि प्रकाश सकपाळ यांचे विदयमानाने लायन्स क्लब, पनवेल यांचे वतीने मेडिकव्हर टीम यांचेद्वारे नवीन पनवेल वाहतुक शाखा येथे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच नवीन पनवेल हद्दीतील स्कुल बस चालक, मालक यांची वैदयकिय तपासणी करून घेण्यात आली. स्कुल बस वरील चालक, मालक हे लहान मुलांना शळेत ने-आण करण्याचे काम करित असतात ते वैद्यकियरित्या सक्षम असणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांची वैदयकिय तपासणी करण्यात आली सदर वैद्यकिय तपासणीमध्ये उंची, वजन, रक्तदाब, शुगर, ईसीजी, सीबीसी तपासणी, डोळे तपासणी यासह इतर प्रकारच्या तपासणी करण्यात आल्या.

या वैद्यकीय तपासणीमध्ये नवीन पनवेल वाहतुक शाखेतील एकुण २० पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच स्कुल बस चालक, मालक ३५ यांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमात लायन्स क्लब पनवेलचे प्रेसिडेन्ट सुरभि पेणसे, ज्योती देशमाने तसेच मेडिकव्हर हॉस्पीटल, नवी मुंबई डॉ. साकेत जहा व टीम तसेच वपोनि प्रकाश सकपाळ, पोहवा जितेंद्र कदम, पोहवा ज्ञानेश्वर वाघ, सहाय्यक फोजदार किशोर लाड हे उपस्थित होते.

# सीकेटी कॉलेजमध्ये तंबाखूमुक्त युवा अभियान उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील सीकेटी कॉलेजआणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूमुक्त युवा अभियान ३.० हा आरोग्यविषयक जनजागृतीचा महत्त्वपूर्ण उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या मनात आरोग्याबद्दल जागरूकतेची नवी उमेद निर्माण केली.



महाराष्ट्र भूषण डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेतून उपजिल्हा रुग्णालय, पनवेलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला विशेष दिशा मिळाली.कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. सायली बेलगे यांनी तंबाखू सेवनाचे तरुणांवर होणारे दुष्परिणाम, शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम तसेच तंबाखूमुक्त जीवनाचे महत्त्व यावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी वक्तव्यातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य संवर्धनाबाबत सकारात्मक बदलाची जाणीव निर्माण झाली. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे दंत तपासणीही करून योग्य सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी तंबाखूमुक्त युवा होण्याची शपथ घेतली आणि निरोगी भविष्यासाठी पुढाकार घेण्याचा संकल्प व्यक्त केला. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि आरोग्यविषयक जबाबदारीची भावना दृढ होते असे नमूद केले.

या उपक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकंदरीत, तंबाखूमुक्त युवा अभियान ३.० मुळे तरुण पिढीत आरोग्यजागृतीचे नवे भान निर्माण झाले असल्याचे समाधान व्यक्त केले गेले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजची 'आविष्कार'मध्ये अंतिम फेरीसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खारघर येथील सरस्वती इंजिनिअरिंग महाविद्यालयमध्ये रविवार दिनांक ३० रोजी मुंबई विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या झोनल अविष्कार फेरीच्या २०व्या आंतरमहाविद्यालयीन रिसर्च आविष्कार कन्वेंशनच्या आंतरमहाविद्यालयीन रिसर्च अविष्कार कन्वेंशनमध्ये सहभाग घेतला होता.

या फेरीत अंडर ग्रॅज्युएट स्तरावरील तब्बल ७००हून अधिक प्रकल्पांची नोंदणी झाली होती त्यापैकी ३६ प्रकल्पांची अंतिम सादरीकरणासाठी निवड करण्यात आली होती त्यामध्ये ०६ विविध गटांमधून निवडलेल्या प्रकल्पांमध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संशोधनाची उत्कृष्ट झलक दाखवली. या सर्वांमधून रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील तीन प्रकल्पांना रायगड झोनमधून आंतर विद्यापीठस्तरावरच्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.



निवड झालेल्या प्रकल्पांचे तपशील पुढीलप्रमाणे-टॅप टू नो मार्गदर्शक : महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे, विद्यार्थी : रेहान मुल्ला व फरीहा पार्कर (एस. वाय.बी. एस. सी.) या प्रकल्पात विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना आवश्यक माहिती 'टॅप'द्वारे मिळावी यासाठी अभिनव संकल्पना सादर केली.

ॲक्रीड इलेक्ट्रो मशीनिंग मार्गदर्शक : डॉ. दीपिका हसीजा विद्यार्थी : शिवम सिंग व सत्यम सिंग (एस. वाय. बी. एस.सी.) इलेक्ट्रो मशीनींग क्षेत्रात नवी दिशा देणारा हा प्रकल्प तांत्रिक दृष्ट्या प्रभावी ठरला. अचूकता, ऊर्जा बचत व नवसंकल्पना यावर आधारित या मॉडेलला परिक्षकांकडून विशेष दाद मिळाली.

स्मार्ट पोल्ट्री लिंक मार्गदर्शक : प्रा. विशाल देशमुखविद्यार्थी : जिया भोईर व साक्षी पाटील ( एस. वाय. बी. एस. सी.) हनीफा शहा (एस. वाय. आय. टी.) खाल्फे अयमान (एस. वाय. बी. कॉम) कुक्कुटपालन व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाधारित स्मार्ट सोल्यूशन देणारा हा प्रकल्प कृषी व औद्योगिक क्षेत्रात उपयुक्त ठरू शकतो, असे परीक्षण समितीने नमूद केले. या यशाबद्दल मार्गदर्शक प्राध्यापक, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या तसेच विभाग प्रमुख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच! विद्यापीठस्तरावरील अंतिम फेरीतही विद्यार्थी उज्वल कामगिरी करतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या सर्व विद्यार्थ्यांना या रिसर्च अविष्कार कन्व्हेन्शन स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तसेच रिसर्च आविष्कार समितीचे, समन्वयक व इतर सर्व सदस्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, तसेच अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# कळंबोलीत महापालिकेतर्फे बांबू वृक्षाची लागवड

## पर्यावरण रक्षणासाठी उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

नाशिकमधील तपोवनमधील झाडे तोडण्यावरून वृक्षप्रेमींमध्ये मोठा संताप व्यक्त होत असताना पनवेल महापालिकेने पर्यावरणाच्या रक्षणासाठी कळंबोलीत रस्त्यालगत तब्बल दोन हजार बांबूच्या वृक्षांची लागवड केली आहे तसेच पर्यावरणाबाबत जनजागृती होण्यासाठी झाडे वाचवण्याचा संदेश देण्यासाठी कळंबोलीतील भिंतीतील रेखाटलेल्या चित्रातून झाडे वाचवण्याचा संदेश महापालिकेकडून देण्यात आला आहे. महापालिकेच्या या पर्यावरण पूरक कामगिरीबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.




कळंबोली येथील शिवसेना शाखा ते केएलइ कॉलेजपर्यंतच्या रस्त्यालगतच्या मोकळ्या जागेत पनवेल महापालिकेच्या उद्यान विभागाकडून दोन हजार बांबूच्या झाडांची लागवड नुकतीच करण्यात आली आहे. या झाडांची देखभाल ही पनवेल महापालिका घेणार आहे.याकरता बांबूची झाडे पावसाळा संपल्यानंतरही चांगल्या पद्धतीने जगावित वाढावीत यासाठी तिथे उद्यान विभागाकडून पाणी झाडांना देण्याची व्यवस्था ही करण्यात आली आहे. या दोन हजार बांबूच्या झाडांचे संगोपन पनवेल महापालिका करणार आहे. याबाबत पनवेल महापालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, रस्त्यालगत असणारी मोकळी जागा ही पर्यावरण पूरक निसर्ग वाढवण्यासाठी करण्यात येणार आहे. येथील जागा ही झाडे लावण्यासाठी राखीव करण्यात आली असून यामध्ये नुकतीच बांबूच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे.

या बांबूच्या झाडांचे रक्षण ही पनवेल महापालिका करणार आहे.त्यामुळे वृक्षप्रेमींकडून या महापालिकेच्या सामाजिक उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला जात आहे तसेच महापालिकेकडून कळंबोलीतील सेंट जोसेफ जवळील रस्त्यालगत असलेल्या भिंतीवर विविध सामाजिक संदेश देणारे चित्र सुविचार चांगल्या पद्धतीत रेखाटण्यात आले आहे. नाशिकमधल्या कुंभमेळ्यासाठी तपोवनतील जागा ताब्यात घेण्यासाठी १८०० झाडांची कत्तल केली जाणार असल्याने राज्यातील वृक्ष प्रेमीं मध्ये संतापाची लाट उसळली आहे. नाशिक महापालिका एकीकडे १८०० झाडांची कत्तल करणार असल्याने त्याचाच विरोधाभास की काय पनवेल महापालिके कडून पर्यावरण पूरक सामाजिक संदेश देण्यासाठी झाडे वाचवण्याचा संदेश भिंतीमधून रेखाटलेल्या चित्रातून दिला जात आहे.

महापालिकेच्या या सामाजिक उपक्रमाचे समाजातील सर्व स्तरातून स्वागत करून महापालिकेला धन्यवाद ही देण्यात येत आहेत. विविध सुविचार व सामाजिक संदेश दिल्या जाणाऱ्या रंगीबेरंगी व आकर्षक चित्रांमुळे कळंबोलीच्या सौंदर्यातही एक प्रकारे भरच पडली आहे. तसेच त्यातून दिले जाणारे सामाजिक संदेश हे या परिसरात येणारे पादचारी विद्यार्थी पालक यांच्यामध्ये निश्चितच रुजवला जाणार आहे.

# पनवेल मनपातर्फे दुबार मतदारांबाबत तपासणी; यादी निर्दोष प्रक्रिया



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५करिता तयार करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीतील संभाव्य दुबार नावाबाबत तपासणी करून मतदार यादी निर्दोष करण्यासाठी बुधवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे व निवासी नायब तहसिलदार संभाजी शेलार यांनी सर्व ४६१ मतदान केंद्र स्तरीय अधिकारी व पर्यवेक्षक यांना प्रशिक्षण दिले आहे. या वेळी उपस्थित मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.), पर्यवेक्षक, महानगरपालिका कर्मचारी यांना मतदार यादीतील दुबार नावे बी.एल.ओ. पच्या मदतीने शोधून सदर मतदार दुबार असलेबाबत खात्री करणे विषयक सूचना देण्यात आल्या.

राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दुबार मतदारांबाबत करावयाच्या कार्यवाहीविषयी सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील एकूण ४६१ मतदान केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून मतदार याद्या अधिकाधिक निर्दोष करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. याच उद्देशाने महापालिकेने पुढाकार घेऊन हे प्रशिक्षण घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या.

प्रारुप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना यांची पडताळणी करून व राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन मतदार याद्या निर्दोष करण्यासाठी सर्वतोपरी कार्यवाही करणार असल्याचे निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

# नागोठण्यात पुन्हा घरफोडी

## नागरिक धास्तावले; पोलिसांसमोर आव्हान

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे हुजरा मोहल्ल्यात सोमवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी पाच फ्लॅट फोडून लाखोंचे ऐवज लंपास केल्याची घटना ताजी असतानाच मंगळवारी (दि. २) रात्री अज्ञात चोरट्यांनी नागोठण्यातील रमाईनगरमधील दोन बंद घरे फोडून लाखोंच्या सोने-चांदीसह ६६ हजार रुपयाची रोख रक्कम लंपास केली आहे. सतत दोन दिवस घरफोडीच्या घटनेमुळे नागोठणेकर धास्तावले आहेत.



नागोठणे रमाईनगरमधील राहिवासी विजय धर्मा शिर्के हे लग्न कार्यानिमित्त मुंबई येथे सहकुटुंब गेले होते. म्हणून त्यांचे घर बंद होते. त्याचाच चोरट्यांनी फायदा घेऊन कुलूप तोडून घरात असलेल्या तीन सोन्याच्या चेन, पाच सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलांचे चार सोन्याचे लॉकेट, अर्धा किलो चांदी आणि १६ हजार रुपयांची रोख रक्कम तसेच अन्य एक रहिवासी सचिन नारायण गायकवाड हे रात्रपाळी असल्यामुळे कामाला गेले होते. त्यामुळे त्यांची पत्नी आपल्या लहान बाळासह रमाईनगर मध्येच राहत असलेले त्यांचे दीर संतोष गायकवाड यांच्या घरी रात्री गेल्या होत्या. त्यामुळे सचिन गायकवाड यांचे घर बंद होते. याचाच चोरट्यांनी फायदा घेऊन कुलूप तोडून त्यांच्या घरात असलेली साडेतीन तोळ्याची सोन्याची गंठण, एक सोन्याचा हार, दोन सोन्याच्या चेन, गंठणचे सोन्याचे पान, सोन्याची बोरमाळा, सोन्याच्या मण्यांची माळ, सोन्याच्या चार अंगठ्या, चार सोन्याचे कानातील छोटे जोड, चार सोन्याचे कानातील मोठे जोड, सोन्याचे मोठे पान, चांदी १ किलो आणि ५० हजार रुपये रोख रक्कम आदी लाखो रुपयांचा ऐवज व ६६ हजार रुपयांची रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे.

या चोरीचा जलद गतीने तपास होण्यासाठी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी अलिबाग जिल्हा पोलीस कार्यालयातून क्राईम ब्रँच, फॉरेन्सिक एक्सपर्ट व डॉग स्कॉर्ड पाचारण करून केले आहे.

नागोठणे रिलायन्स कंपनीच्या वाढीव प्रकल्पाचे फार मोठया प्रमाणात कामे चालले असल्यामुळे त्या ठिकाणी काम करण्यासाठी परप्रांतीय मजूर हजारोच्या संख्येने आले आहेत. नागोठण्यात त्यांना राहण्यासाठी फ्लॅट किंवा घरे कमी पडत असून याचाच फायदा दलाल घेत असून ते आपल्या फायद्यासाठी त्या मजुरांची कुठलीही विचारपूस न करता त्यांना राहण्यासाठी घरे व फ्लॅट मिळवून देत आहेत. त्यामुळे नागोठण्यात घरफोडीचे प्रमाण वाढल्याचे बोलले जात आहे. जे भाडेकरु नागोठण्यात राहत असतील त्या सर्व भाडेकरुंचे आधार कार्ड व माहिती संबंधित घरमालकांनी नागोठणे ग्रामपंचायत व पोलीस ठाण्याला द्यावी अशा सूचना नागोठणे ग्रामपंचायतीचे पहिले लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक यांनी केली आहे.

दरम्यान, पाच ते सहा दिवसात आम्ही चोरट्यांच्या मुसक्या आवळून तुमचे सोने आम्ही मिळवून देऊ असे आश्वासन या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी दोन्ही कुटुंबियांना देऊन त्यांना दिलासा दिला आहे. घरात शक्यतो मौल्यवान सामान व वस्तू ठेवू नका तसेच या थंडीच्या महिन्याचा फायदा घेऊन चोरटे पहाटे २ ते ४ वाजेदरम्यान चोऱ्या करीत आहेत. त्यामुळे नागरिकांनी सावधानता बाळगा. पोलीस लक्ष देऊनच आहेत, परंतु नागरिकांनीदेखील आम्हाला सहकार्य करा, असे आवाहनही कुलकर्णी यांनी केले आहे.

# पेण पालिकेसाठी ७०.३० टक्के मतदान



**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या १२ प्रभागात शेवटचे मतदान होईपर्यंत ७०.३० टक्के मतदान झाले. यात एकूण मतदार ३३८७५पैकी महिला मतदार ११६०६ व पुरुष मतदार १२२०८ यांनी मतदान केले.

सकाळी साडेसात वाजता मतदानास सुरुवात झाल्यानंतर साडेनऊ वाजेपर्यंत १०.३४ टक्के मतदान झाले. ११.३०पर्यंत २४.६७ टक्के मतदान नोंदवण्यात आले. त्यानंतर आकडेवारी वाढून दुपारी दीड वाजेपर्यंत ४०.५३ टक्के मतदान झाले. यानंतर साडेतीन वाजेपर्यंत ५५.१६ टक्के मतदान झाले.

पेण नगरपालिकेत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, मित्रपक्ष महायुतीच्या वतीने माजी नाराध्यक्ष प्रितम ललित पाटील, काँग्रेसच्या नंदा म्हात्रे, तर आम्ही पेणकर विकास आघाडीतर्फे रिया धारकर या रिंगणात उभ्या होत्या.

१२ प्रभागांसाठी २४ नगरसेवक असताना सहा नगरसेवक अगोदरच बिनविरोध विजयी झाले असल्याने १८ नगरसेवकपदांसाठी निवडणूक झाली.

मतदानादरम्यान काही ठिकाणी नेते व कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली होती. याठिकाणी पोलिसांनी तत्काळ भेट देऊन वाद थांबविला. मतदानाच्या दिवशी वाढीव पोलीस बंदोबस्त ठेवून प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यात आली.

या निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी लागणार असल्याने उमेदवार आणि कार्यकर्त्यांना मात्र फार दिवस वाट पहावी लागणार आहे. तोपर्यंत शांतता असेल.

# माणगावच्या डीजीटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या डीजीटी महाविद्यालयातील आजिवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या विद्यार्थ्यांनी २९ नोव्हेंबर रोजी मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव अशोक साबळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम. खामकर यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली माऊली वृध्दाश्रम बोरवाडी निजामपूर येथे भेट दिली.




या भेटीवेळी विद्यार्थ्यांनी फळे, थंडीत घालणाऱ्या वस्तू व खाऊ तसेच गुलाबांचे वाटप केले आणि सर्व वृध्द माता-पित्यांचे आशीर्वाद घेतले. माऊली आश्रमाचे अध्यक्ष देशपांडे व परांजपे या वेळी उपस्थित होते. वृध्दाश्रमास भेट दिल्यानंतर या नवीन तरूण पिढीला आई-वडिलांचे नाते व त्यांचे प्रेम याचे महत्त्व समजले. तसेच आश्रमामध्ये असलेल्या ६० वर्षांपासून ९३ वर्षापर्यंत वृध्दांचा सहवास विद्यार्थाना लाभला.

या आधुनिकीकरणाच्या युगात तरुण पिढी आपल्या आई-बाबांना आपल्यापासून दूर ठेवून त्यांच्या प्रेमापासून वंचित राहून आपण आपल्या भारतीय संस्कृतीपासून आपण परावृत्त होत आहोत, हे या भेटीच्या माध्यमातून समजले. या वृध्दाश्रमाला भेट दिल्यानंतर ज्या आई-बाबांनी आपल्या गरजा बाजुला ठेवुन आपल्याला या जगात चालायला शिकवले स्वःतहाच्या गरजा भागवण्यासाठी सक्षम बनवून कर्तव्याची जाणीव करून दिली अशा थोर आई - वडिलांना आपण आपल्या पासून कधीही अलिप्त होऊ दयायचे नाही, अशी प्रतिज्ञा या कार्यक्रमाच्या निमीत्ताने विद्यार्थांनी घेतली.

विद्यार्थ्यांनी माऊली वृध्दाश्रमास भेट देवून तेथील वृध्दांना प्रसन्न,आनंदी व त्यांना समाधान वाटावे अषी कल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.खामकर यांची होती. हा कार्यक्रम यषस्विरीत्या संपन्न होण्यासाठी आजिवन अध्ययन विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.मेहरीन डावरे, प्रा.देवांक परब, डॉ. पाण्डेय जे.आर.प्रा. मंजीरी सावंत, प्रा.नेहाल वलीले, प्रा.पंकज गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच विद्यार्थांनीसुध्दा सहकार्य केले.

# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव शहरात एका रिक्षाचालकाने दाखवलेली प्रामाणिक कृती कौतुकास्पद ठरली. सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा वडेकर या खांदाड येथे हळदीच्या कार्यक्रमाला जाताना रिक्षेतून प्रवास करत होत्या. सोबत मैत्रिणी सेवानिवृत्त शिक्षिका मंजिरी बापट आणि शिक्षिका रश्मी अंबुर्ले होत्या. घरी परतल्यावर त्यांच्या कानातील अंदाजे पाच ग्रॅमची सोन्याची कुडी हरवल्याचे त्यांना जाणवले.

दुसऱ्या दिवशी रिक्षाचालक संदीप बाळकृष्ण भोनकर यांनी आपल्या रिक्षेची रोजची साफसफाई करत असताना एका कोपऱ्यात सोन्याची कुडी त्यांना दिसली. क्षणाचाही विलंब न लावता भोनकर थेट वडेकर यांच्या घरी गेले आणि सोन्याची कुडी त्यांच्या हातात दिली. त्यांनी भोनकर यांना बक्षीस देऊ केले, परंतु ते विनम्रपणे नम्रपणे नाकारले. वडेकर यांनी भोनकर यांचे मनापासून आभार मानले. रिक्षाचालक भोनकर यांच्या प्रामाणिक कृतीचे कौतुक होत आहे.

# मुरूड दत्त मंदिर परिसरात यंदा तीन दिवस यात्रा भरणार

**मुरूड : प्रतिनिधी**

सुमारे ३०० वर्षापूर्वीचे मुरूड येथील श्री दत्त मंदिर उंच अशा डोंगरावर वसलेले आहे. असंख्य भाविक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात. कोरोना काळापासून डिसेंबर महिन्यात भरणारी जत्रा भरत नव्हती, परंतु यंदा तीन दिवसांच्या जत्रेचे आयोजन व्यवस्थापन कमिटीमार्फत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दत्त जयंती यात्रा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत.

४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता महाड येथील श्री दत्तात्रेय उपाध्ये यांचे कीर्तन होणार आहे. तद्नंतर सायंकाळी ७ ते १० या वेळेत महेश सुर्वे यांचे भजन होईल. ५ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता खरआंबोली ग्रामस्थ कीर्तन सादर करतील. रात्री ८ वाजता हरिपाठ होणार आहे. ९.३० वाजता नांदगाव येथील विद्याधर चोरघे यांचे व शिव महेश पाटील यांचे भजन होईल. ५ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता भजन व तत्पूर्वी पहाटे काकड आरती होणार आहे. ६ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता किल्ले बांधणी स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे

# बाळसई येथे दत्त जन्मोत्सव

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील बाळसई येथे ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. मंडळाचे २७वे वर्षे आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता मंत्रविधी व होमाने होईल. सायंकाळी ६च्या सुमारास जन्म सोहळा झाल्यावर दत्त पादुकांची पालखी मिरवणूक निघेल. पालखी मंदिरात आल्यानंतर महाप्रसाद व रात्री ९.३० वा. ह.भ.प. विशाल महाराज यादव यांचे कीर्तन होईल.

# उसर खुर्दमध्ये साकारला वनराई बंधारा

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञानमंदिर, उसर खुर्द विद्यालयामार्फत नुकतेच तेथील नदीवर वनराई बंधारा बांधण्याचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या बंधाऱ्याचे उद्‌घाटन उसर गावचे माजी अध्यक्ष पांडुरंग कदम यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

**विद्यार्थ्यांचे श्रमदान**



कार्यक्रमाला शहाजी जगताप, यादव, दिलीप घाग तसेच माजी विद्यार्थी आशिष घाग (पाणी समिती सेक्रेटरी), गणेश सावंत, साक्षी विचारे, समीर घाग आदी उपस्थित होते. ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि माजी विद्यार्थी सौरभ शिंदे यांनी ग्रामसेवक प्रचित माशाळ यांच्या सहकार्याने बंधारा बांधण्यासाठी लागणाऱ्या सिमेंटच्या पिशव्यांची व्यवस्था केली.

उपक्रमात विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सिमेंटच्या पिशव्यांमध्ये माती भरून मोठ्या श्रमांनी बंधारा उभारला. संविधान दिनानिमित्त मुलांना श्रमाचे महत्त्व समजावे तसेच पर्यावरण-जतनाची जाणीव निर्माण व्हावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी सांगितले. वनराई बंधाऱ्यामुळे निर्माण झालेले पाणी पंचक्रोशीतील सहा गावांतील गुरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून बंधाऱ्यालगत असलेल्या विहिरीतील पाण्याचीही पातळी वाढणार आहे.

गेली २५ वर्षे उसर हायस्कूल विविध ठिकाणी बंधारे बांधून सामाजिक कार्याचा वसा जपत आहे. या उपक्रमाबद्दल संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष किशोर अल्हाट, सदस्य विजयराव सावंत, कोषाध्यक्ष विश्वास सोनवणे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ.नंदकिशोर जोशी यांनी समाधान व्यक्त करून पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक विनोद लाड, कालगुडे, विद्या शिर्के, गावित यांनी मेहनत घेतली. सरतेशेवटी ग्रामपंचायत उसर खुर्दतर्फे ग्रामसेवक प्रचित माशाळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन उपक्रमाची सांगता करण्यात आली.

# चौल येथील पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान

पौराणिक व्दापारयुगात चौल-रेवदंडाचा उल्लेख रेवतीनगर असा लिखित आहे. इतिहासकालात विदेश व्यापारांशी संलग्न असलेल्या चौल चंपावतीनगरीत प्रसिध्द अशी ३६० मंदिरांची नोंद सापडते. चौल रामेश्वर, चौल शितळादेवी, हिगुंळजा देवी, मुखरी गणपती, महालक्ष्मी, चंपावतीदेवी, चौल कुडेंश्वर मंदिर, रेवदंडा हरेश्वर मंदिर, मारूती मंदिर आदी मंदिरे अद्याप इतिहासाची साक्षीदार आहेत. त्यापैकी चौल भोवाळे येथील पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान एक आहे.



चौल भोवाळे येथील पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान प्रसिध्द आहे. येथे दत्त जयंतीच्या पाच दिवसांचे यात्रेला रायगड जिल्ह्यासह मुंबई, पुणे, ठाणे आदी ठिकाणाहून अंदाजे तीन लाख यात्रेकरू येतात. अलिबाग तालुक्यातील सर्वात मोठी व वर्षातील शेवटची यात्रा दत्त जयंती उत्सहात साजरी होते.

पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान फारसे पुरातन नसल्याचे सांगितले जाते. दत्त यात्रेसंबंधी पुरातन काळातील उल्लेख सापडत नाही, मात्र नवनाथांचेसुद्धा येथे वास्तव्य होते असे नवनाथ ग्रंथावरून वाटते. हे मंदिर पुरातन नसले तरी इतिहासीक निश्चित आहे, कारण आग्रांच्या उत्तरकालीन इतिहासात या दत्त मंदिराचा उल्लेख वरचेवर आढळतो तसेच आंग्रे घराण्यातील पुरुषांची या पर्वतवासी दत्तावर अतिशय श्रध्दा होती.

इ.स. १८१०च्या मार्च-एप्रिलमध्ये डोंगरावर कोणी एक गोसावी राहत होता. त्याने तिथे एक मठी बांधली. हा गोवावी दत्ताची भक्ती करीत असे. एक दिवस त्याने दत्ताच्या पादुका पूर्वीच्या जागेवरून काढून त्या आपल्या मठीत आणल्या आणि घगरीखाली पुरून ठेवल्या. पुढे १८३१ मार्च-एप्रिलमध्ये एक पाषाणाची दीपमाळ बांधण्यात आली. १८३४च्या डिसेंबरमध्ये गोविंद वाडकर नावाच्या रेवदंड्याच्या कोळी गृहस्थाने पादुकांच्या भोवताली प्रदक्षिणेची साधी असलेली वाट चुनेगच्चीची केली, तर वर कळस बांधला. १८४३मध्ये गणेशभट गुजराथी प्रभासकर यांनी भिक्षा मागून पैसे जमविले आणि मठीचा जीर्णोध्दार केला, त्यावर कौलारू मंडप बांधला. या ठिकाणी एक फिरता बैरागी वस्तीस आला. त्याने १८५७च्या नोव्हेंबरमध्ये दत्ताची एक पाषाणमूर्ती आणली आणि तिची जुन्या पादुकांजवळ स्थापना केली.

श्री दत्तात्रंयाची यात्रा मार्गशीर्ष शुध्द पौणिमेला श्री दत्त जयंतीपासून पाच दिवस रात्रंदिवस भरते. या यात्रेत लाखो रुपयांची उलाढाल होते. या यात्रेत श्री दत्तात्रयांच्या मूर्तीवरून कोंबडी ओंवाळून टाकली जात असे व ती इतर लोक पकडून घेऊन जात असत, मात्र काळाचे ओघात ही प्रथा बंद झाल्याचे ऐकिवात येते.

याशिवाय दर गुरूवारी भक्तगण बहुसंख्येने दत्त दर्शनास येतात तसेच सहलीला येणारे पर्यटकसुध्दा श्री दत्तात्रयांचे दर्शन घेतात. त्यांच्या दर्शनाने अडीअडचणींचे निवारण होते अशी लोकांची श्रध्दा आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी या नगरीतील पाइारे क्षत्रिय पाचकळशी समाजापैकी मुंबईत राहणाऱ्या मंडळीनी सुमारे ४० ते ६० वर्षापूर्वी तयार केलेला चांदीचा मुखवटा चौल थेरोंडा येथून पालखीतून वाजतगाजत दत्त मंदिरात आणला जातो. मूळ दत्तमूर्तीची यथासांग पूजा करून हा मुखवटा या मूर्तीला लावतात. यात्रेपूर्वी या दत्त मंदिरात सात दिवस सप्ताह चालतो, जो हरेरामबुवा यांनी चालू केला होता. या सप्ताहात आंदोशी गावापासून रामराजपर्यत साधारणतः १९ गावे सहभाग घेतात. हा सप्ताह रात्रंदिवस यात्रेदरम्यान सुरू असतो.

या मंदिराच्या टेकडीकडे जाताना वाटेत अनेक मंदिरे लागतात. राम मंदिर, जाखमाता मंदिर, थोडे पुढे गेल्यावर टेकडीवर जीर्ण गोल देऊळ आहे. हे मंदिर एकतर नाथापैकी पिंगळा सतीचे देऊळ असावे. या देवतेच्या नावावरूनच समोरच्या तळ्याला भोवाळे हे नाव पडले असावे. तळे संपते तोच समोर दिसते ते भोवाळे गाव. याच गावाजवळ चौलनाका ते वावे या मुख्य रस्त्यावर डावीकडे जो मार्ग जातो तो दत्त मंदिराकडे. मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता डांबरीकरणाचा आहे. वाहनेसुध्दा पायऱ्यांपर्यत जातात. सुरुवातीला मंदिराकडे जाताना उजवीकडे मुरलीधराचे देऊळ आहे. या धर्मशाळेमध्ये पूर्वी प्राथमिक शाळेचे वर्ग भरायचे, मात्र सद्या ही धर्मशाळा पडिक आहे.

दत्त मंदिराकडे जाताना लागणाऱ्या पायऱ्या सहा फुट रूंद आहेत. या पायऱ्या कोणी नवसाच्या किंवा स्मरणार्थ अशा पाच, सहा, दहा बांधल्या आहेत. तेथेच त्यांचा शिलालेखही आहेत. अंदाजे एकूण सातशे पायऱ्या दत्त मंदिराकडे जाताना असाव्यात असे सांगितले जाते. येथून पुढे अर्ध्या पायऱ्या चढून गेल्यावर डाव्या बाजूला अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थाचा मठ आहे. पुढे बुरांडे महाराज समाधी मंदिर आहे व तेथून थोडे वर गेल्यावर उजव्या बाजूला नवनाथ संप्रदायांचा नवनाथ दरबार आहे.

दत्तात्रयांच्या मंदिराजवळून जाताना आजूबाजूस पाहिल्यावर मन हरखून जाते. पूर्वेस लांब लांब परिसरात डोंगराच्या रांगा व टेकडीच्या पायथ्याशी हनुमानपाडा त्यापुढे गेल्यावर खिडीत एक पुरातन दोन घुमटाचे सुंदर सोमेश्वर मंदिर आहे. त्याच मंदिराच्या समोरील डोंगराच्या माथ्यावर पुरातन खडकात खोदलेले वाघेश्वरी देवीचे देऊळ आहे. तेथून आजूबाजूची शोभा रमणीय दिसते, मात्र मंदिरापर्यत जाण्यासाठी पायऱ्या नाहीत.

दत्त मंदिराच्या पाठीमागे म्हणजे पश्चिमेला चौल व रेवदंडा, अलिबाग तालुक्यास जोडणारा रेवदंडा पूल, कोर्लईचा किल्ला, कुंडलिका खाडी, वेलस्पुन कंपनी साळाव व अफाट अरबी सागर असे डोळ्यांचे पारणे फेडणारे दृश येथून दिसते. दत्त मंदिराच्या दक्षिणेला खाली उतरले की लगेचच माई जानकीबाई हनुमानदास मठ लागतो. ही जानकीबाई नावाच्या माई मठी आहे. या मठीत राम-लक्ष्मणाची जुनी मूर्ती आहे. त्यानंतर मठीचा जीर्णोध्दार कृष्णदास बाबांनी केला. सध्या मठात बऱ्याच मूर्ती पहावयास मिळतात. येथून पायवाटेने खाली उतरले की हिगुंळजा देवीचे मंदिर आहे. येथे आपणास बुध्द लेणीही दिसून येतात. हे मंदिर पांडवकालीन असल्याचा उल्लेख सापडतो. हिंगुळजा देवीच्या मंदिराला लागूनच अन्नपुर्णा देवीचे आत गुंफेत स्थान आहे. तेथे साधूंना तपाला बसण्यासाठी बऱ्याच कोठड्या आहेत पहिल्याच कोठडीत एक निशाणी आहे, ती गुप्तमार्गाची असावी असे म्हणतात. या टेकडीवरून आजूबाजूच्या सृष्टी सौंदर्याचा आस्वाद घेता येतो. तेव्हा माणूस नकळत हात जोडून नतमस्तक होतो.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत रायगड उपविजेता

## ४१ पदकांची कमाई



**अलिबाग : प्रतिनिधी**

सहावी राज्यस्तरीय लाठी स्पर्धा सोलापूर येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी ३८ सुवर्ण, तीन रौप्य व एक कांस्य अशी एकूण ४१ पदकांची कमाई केली. यासह रायगड उपविजेता ठरला.

एकमलाठी प्रकारात विहान अनिकेत नाईक, देवदत्त मनीष पडवळ, सिद्धार्थ अशोक पाटील, रुद्रा विनय पिळकर, पर्णवी नाईक, अवनी पाटील यांनी सुवर्णपदक जिंकले. द्विलाठीमध्ये शिवांश निखिल पाटील, शिवम संदेश गुंजाळ, मल्हार संदेश गुंजाळ, अवनी राजेंद्र कवळे, रुद्रा विनय पिळकर सुवर्णपदक, द्विअनिका प्रकारात दक्ष प्रशांत थळे, निल मगर, हार्दिक अकोलकर, वेद वैभव कदम, ओवी पाटील, प्रेक्षा पाटील यांनी सुवर्णपदक मिळवले. पंचम लाठी बाराचा गटामध्ये तीर्थ धनावडे, जाई धनावडे, पर्णवी नाईक, सिद्धी ढोलकशे, अनन्य वैभव निकम यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले.

१४ वर्षे मुलांच्या गटामध्ये आराध्या पंडित नखाते, ओवी पाटील, प्रेक्षा पाटील, अवनी कवळे, अवनी पाटील यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. मुलांच्या गटामध्ये मल्हार संदेश गुंजाळ, शिवम संदेश गुंजाळ, देवदत्त मनीष पडवळ, हार्दिक संतोष अकोलकर, श्लोक अतुल जाधव यांनी सुवर्णपदक पटकावले. अष्टममध्ये नम्रता गणेश चव्हाण, मुरुम प्रकारात आराध्या पंडित नखाते, श्लोक अतुल जाधव, महरुममध्ये आभा संदेश आठवले, एकममध्ये श्रीयश संचित म्हात्रे, दक्ष थळे व अर्णव सिद्धेश तीवरेकर यांनी सुवर्णपदक जिंकले.

एकमलाठी प्रकारात १० वर्षांखालील गटात श्रीयश म्हात्रे, १२ वर्षांखालील गटात दक्ष थळे, द्विलाठी १६ वर्षांखालील गटात अर्णव तिवरेकर यांनी, तर एकम लाठी प्रकारात १४ वर्षांखालील गटात मुलांमध्ये सोहम शरद गोवाने कांस्यपदक मिळवले.

सोलापूर येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेल्या खेळाडूंची तमिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रायगडच्या सर्व खेळाडूंचे लाठी असोसिएशन रायगडचे अध्यक्ष प्रमोद मसाल यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय पंच प्रियंका गुंजाळ, सिद्धार्थ पाटील, वेदांत सुर्वे, शुभम नखाते यांचे मार्गदर्शन लाभले.

# राज्य बेंचप्रेस स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंचे उल्लेखनीय यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्ञानेश्वर महाविद्यालय वडाळा मुंबई ३१ येथे राज्यस्तरीय बेंचप्रेस क्लासिक व इक्विप स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत रायगडच्या पुरुष व महिला खेळाडूंनी १५ सुवर्ण, नऊ रौप्य आणि नऊ कांस्य अशी एकूण ३३ पदके प्राप्त केली.





याशिवाय रायगडचा खेळाडू अब्दुल्ला दुस्ते (क्वाडझिला जिम महाड) हा स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र ज्युनियर क्लासिक पुरुष गटात उत्कृष्ट ठरला तसेच रायगड जिल्ह्याला क्लासिक स्पर्धेत ज्युनियर पुरुष गटाचे सांघिक विजेतेपद प्राप्त झाले.

रायगड संघाचे व्यवस्थापक म्हणून सुभाष टेंबे, तर सहाय्यक म्हणून संदीप पाटकर आणि प्रशिक्षक म्हणून माधव पंडित यांनी काम पाहिले.

रायगडच्या पदक, किताब आणि सांघिक विजेतेपद प्राप्तीबाबत संघटनेचे अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव, खजिनदार राहुल गजरमल, सदस्य मानस कुंटे आणि सचिव अरुण पाटकर यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**पदकप्राप्त खेळाडू**

सुवर्ण : अमृता भगत खोपोली (दोन सुवर्ण), अद्वैत भोसले महाड, अब्दुल्ला दस्ते महाड, तन्मय पाटील पेण, शंतनु जोशी कर्जत, नितीन शेजवळ खोपोली, दिनेश पवार खोपोली, सचिन देशमुख खोपोली, ऋषिकेश घोसाळकर, ऋषिकेश घोसाळकर खोपोली, हर्षद देशमुख कर्जत, हनुमंत खरात कर्जत, जितेश साजेकर, गायत्री बडेकर, अंजली येवले कर्जत; रौप्य : झाहिद काणेकर महाड, मयुरेश म्हात्रे खोपोली, आसिफ सय्यद खोपोली, ऋतिक पोळ खोपोली, नासिर सय्यद खोपोली, राज कडू कर्जत, ऋतिक पोळ खोपोली, वैष्णवी गंगावणे कर्जत, प्रणाली माने खोपोली, आशा घरत पेण; कांस्य : साई पाटील पेण, रौनक जितेकर दापोली पनवेल, सुरज धीमल खोपोली, संदीप सावंत खोपोली, विवेक धाकवल कर्जत, यश पंगत पेण, अनुषा बॅनर्जी पनवेल, संगीता पंगत रसायनी पनवेल.

# 'आरडीसीए'च्या १६ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) च्या वतीने जिल्ह्यातील विविध मैदानांवर १६ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला शुभारंभ झाला आहे. जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील एकूण २८ क्रिकेट अकॅडमी व क्लबच्या संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

स्पर्धा रायगड जिल्ह्यातील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, खारघर येथील बी.पी. पाटील मैदान, घरत क्रिकेट मैदान, पनवेल येथील फोर्टी प्लस गावदेवी क्रिकेट मैदान टेंभोडे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवेसह अन्य उपलब्ध होणाऱ्या मैदानांवर खेळवली जाणार असून प्रथम साखळी व नंतर बाद फेरी अशी होणार आहे. स्पर्धेत जवळपास ५० एकदिवसीय ४० षटकांच्या सामन्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धेत केलेल्या कामगिरीच्या आधारावर खेळाडूंची निवड रायगडच्या संघात होणार असून निवडलेला संघ पुढे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या निमंत्रित निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

याआधी आरडीसीएच्या वतीने १७ व १९ वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे तसेच एमसीएतर्फे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षाखालील आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्याचा संघ सुपर लीगमध्ये पात्र ठरला आहे. अशा स्पर्धांच्या माध्यमातून कौशल्य मैदानावर दाखवण्याची संधी मिळत असल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

१६ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, उपाध्यक्ष राजेश पाटील, यशवंत साबळे, संतोष भोईर, सहसचिव जयंत नाईक, बशीर चिचकर, खजिनदार प्रशांत ओक, सदस्य समीर मसूरकर, कौस्तुभ जोशी, प्रदीप खलाटे, ॲड. पंकज पंडित आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सुधागड बॅडमिंटन लीग जल्लोषात

## अमीर पठाण-परेश वडके जोडी विजेती

**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील क्रीडा संकुलात नुकतीच सुधागड बॅडमिंटन लीग स्पर्धा उत्साहात झाली. सुधागड बॅडमिंटन क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा तालुक्यातील बॅडमिंटनप्रेमींसाठी पर्वणी ठरली.



स्पर्धेत तालुक्यातील नामवंत तसेच होतकरू खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत रंगतदार सामने साकारले. उत्कृष्ट फॉर्मात खेळलेल्या अमीर पठाण आणि परेश वडके या जोडीने सर्व प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपदाचा बहुमान पटकावला. नितीश देशमुख-चिंतामणी खोडागले जोडीने उपविजेतेपद मिळवले, तर अमोल कांबळे-खानेकर गुरुजी यांनी तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. तुषार खोडागले आणि सहकारी यांनी चौथा क्रमांक मिळवला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्लबचे अध्यक्ष विनय मराठे यांच्यासह दीपक फोडे, बाला खैरे, मकरंद खोडागले, संदेश सोनकर यांनी भूमिका बजावली.

# मि. आशिया मेन फिजिक स्पर्धेत उरणच्या प्रतिक दर्णेला कांस्यपदक

**उरण : बातमीदार**

थायलंडमधील पटाया येथे पार पडलेल्या एशियन फिटनेस अ‍ॅण्ड बॉडी बिल्डिंग चॅम्पियनशिपमध्ये मेन फिजिक या प्रकारात उरणच्या प्रतिक दर्णे याने कांस्यपदक पटकाविले. याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रायगड जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटना, महाराष्ट्र राज्य हौशी शरीरसौष्ठव संघटना तसेच इंडियन फिटनेस अ‍ॅण्ड बॉडी बिल्डिंग फेडरेशनमधून प्रतिकची निवड मि. आशिया मेन फिजिक या स्पर्धेसाठी झाली होती. त्याने ही निवड त्याने सार्थ करून दाखवली. या स्पर्धेसाठी ज्यांनी ज्यांनी मदत केली अशा सर्वांचे प्रतिकने आभार मानले. यापुढे रायगड जिल्ह्यातील स्पर्धक आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयार करण्याचे त्याचे ध्येय आहे.




# शरीरसौष्ठवपटू प्रणव पुजारीची आयसीएन प्रो शोसाठी निवड



**अलिबाग :** गोवा येथे झालेल्या आयसीएन इंडिया बॉडी बिल्डिंग स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील शरीरसौष्ठवपटू प्रणव उमेश पुजारी याने वेगवेगळ्या प्रकारात उत्तम कामगिरी केली. त्यामुळे प्रणव हा २०२६मध्ये आयसीएनच्या वतीने होणाऱ्या शोसाठी पात्र ठरला आहे.

प्रणवने बॉडीबिल्डिंग कॅटगिरीत तिसरा क्रमांक, पुरुष फिजिक कॅटेगिरीत चौथा क्रमांक, पुरुष फिटनेस मॉडेल कॅटेगिरीत सुवर्णपदक, तर प्रो क्वालिफिकेशन स्पर्धेत ३० स्पर्धकातून तिसरा येण्याचा मान पटकाविला आहे. या कामगिरीबद्दल प्रणवचे अभिनंदन होत आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे शुटिंग बॉलमध्ये सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयान शुटिंग बॉल स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत १७ वर्षाखालील गटात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. या संघात रूद्र सुनील पाटील, कुलदीप संजय सिंग, करण दीपक सुरडकर, सागर मंजुनाथ सिद्दापूर, श्रेयश मोहन पुकळे, प्रिया भिमराव पवार, सलाऊद्दीन जाहिर पटेल, समर्थ महेंद्र म्हात्रे, अजित राजेंद्र झिने, ओंकार निलेश इंदुलकर यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी अभिनंदन व कौतुक केले.

वर्ष ४२ वे ।।ॐ श्री बाळकृष्णाय नमः ।। स्थापना १९८३

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह

श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर



पिताजी श्री. चांगू काना ठाकूर
माताजी श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर

अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सदगुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ।।१३।।, शके १९४७, बुधवार दि.०३/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ।।१५।। । पौर्णिमा पौर्णिमा श शके १९४७, शुक्रवार दि.०५/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरुबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

: कार्यक्रम :

| | |
|---|---|
| | **गुरुवार दि.०४/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर, बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा), तबला रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब. पुणे. ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण |
| दुपारी २ ते ४ | श्री विश्वभर भजन मंडळ, गव्हाण, गायक हेमंत कोळी, पखवाज प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ५ | विठ्ठल रुखमाई हरिपाठ मंडळ, कोपर, गायीका सौ. अनुसया घरत, सो. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील. सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर, वादक : दिनेश घरत |
| सायं ५ ते ६ | दत्त जन्मोत्सव |
| सायं ८ ते ९ : भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे- बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ : किर्तन | श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ, कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर. पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी). पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर, (गव्हाण) सर्व गुरुबंधू भगिनी |
| | **शुक्रवार दि.०५/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा ओवेपेठ) बुवा : निवृत्ती चौधरी, मंगेश चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), पखवाज: निलेश पाटील |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

देवसागर साधक समाज श्री स. स. बाळकृष्ण महाराज यांच्या १२५ वा जयंती निमीत्त दिंडी सोहळा बुधवार दि. ०३/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३० वाजे पर्यंत.

कार्यक्रमाचे ठिकाण : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल.

व्यवस्थापक : देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) शिवाजीनगर - गव्हाण - न्हावेखाडी - कोपर (संचलित)

संयोजक : श्री. रामशेठ ठाकूर माजी खासदार आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com